# प्रकरण चौथे

## 'वारुळ' कादंबरीचे सामाजिक व वाङ्.मयीन मूल्यमापन

१) प्रस्तावना
२) 'वारुळ' मधील समाजदर्शन
  २.१) मातंग समाज आणि आशयसूत्रे
  २.२) बौध्द समाज आणि आशयसूत्रे
  २.३) कुणबी समाज आणि आशयसूत्रे
३) 'वारुळ' ची निवेदन पध्दती
४) 'वारुळ' मधील संवाद
५) 'वारुळ' ची भाषाशैली
  ५.१) वास्तव असलेल्या प्रदेशाची भाषा.
  ५.२) मातंगांची भाषा
  ५.३) बौध्द समाजाची भाषा
  ५.४) कुणबी समाजाची भाषा
६) म्हणी व वाक्यप्रचार
७) 'वारुळ' शीर्षकाची प्रतिकात्मकता
८) 'वारुळ' मधील व्यक्तिरेखा
  ८.१) मुख्य व्यक्तिरेखा
  ८.२) गौण व्यक्तिरेखा
९) 'वारुळ' मधील वातावरण
  ९.१) शैली
१०) 'वारुळ' मधील लेखकाची तटस्थवृत्ती
११) समारोप
१२) निष्कर्ष
१३) संदर्भसूची

# प्रकरण चौथे

# 'वारुळ' कादंबरीचे सामाजिक व वाङ्.मयीन मूल्यमापन

## १) प्रस्तावना :—

कादंबरी हा बहुआयामी तसेच सामाजिक आशयद्रव्य असलेला वाङ्मयप्रकार आहे. त्यामुळे एखादया कादंबरीतील जीवनचित्रण प्रत्ययी आहे, की नाही हे व्यक्तिचित्रण आणि समाजीवनचित्रण यावरुन समजून येते. कादंबरीमधून सामाजिक वास्तव प्रकट झालेले असते. एखाद्या समाजाचे सर्वांगीदर्शन लेखक वाचकांना आपल्या साहित्यातून घडवित असतो. ज्या कादंबऱ्यामध्ये सामाजिकता प्रकर्षाने जाणवते त्यांना आपण सामाजिक कादंबरी म्हणतो. कादंबरीच्या इतिहासाकडे नजर टाकल्यास आपल्याला सामाजिक कादंबरी मोठया प्रमाणावर निर्माण झाल्याचे दिसते. सभोवतालच्या परिचित विश्वाचे चित्रण करणाऱ्या वास्तववादी कादंबऱ्या अनेक येतात. या कादंबऱ्यात विविध पात्रे, त्यांच्या कृती, एक ठरावितक कालखेड या कादंबऱ्यातून येतो. कादंबरीत विशिष्ठ स्थळ असते; त्याचे भरपूर तपशिल कादंबरीत येत असते. त्यांना एक सामाजिक संदर्भ असतो. एका विशिष्ठ वातावरणाची निर्मिती यात महत्त्वाची असते. सामाजिक कादंबरी सतत गतिमान काळाचे भान देत असते. सामाजिक कादंबरीत सामाजिकतेची वैशिष्टये प्रकर्षाने आढळतात. ज्या समाजाचे चित्रण कादंबरीकार करतो त्या समाजाची स्पंदने तो लक्षात घेतो. म्हणूनच एकजिनसी सरळ समाजाचे चित्रण सामाजिक कादंबरीत आढळते. कादंबरीकार हा आपल्या समाजाशी बांधलेला असतो. तो समाजाचा जबाबदार घटक असतो. "समाजाचा विचार करणारा एक डोळस घटक"[१] असे सामाजिक कादंबरीकाराबद्दल म. द. हातकणंगलेकर यांचे मत आहे. कादंबरीकार समाजात राहतो, वागतो, वावरतो त्यामुळे तो समाजाच्या प्रत्ये घडामोडीत सामील असतो तो समाजाचे निरीक्षण डोळसपणे करुन त्याचे तपशिल कादंबरीत घेतो.

सामाजिक कांदबरीच्या विवेचनानंतर सामाजिक कांदबरीचे मूल्यमापन करणे महत्त्वाचे ठरते. सामाजिक कादंबऱ्यांच्या समीक्षेसाठी समाजशास्त्रीय समीक्षेच्या सर्व कसोटया वापरुन तिचे मूल्यमापन केले जाते. 'संज्ञा संकल्पना कोशात' सामाजिक कादंबरीच्या समीक्षेबद्दल हातगंणलेकर मते "सामाजिक कादंबरीचे मूल्यामापन करताना ती कादंबरी समाजाच्या गतिशील परिवर्तनाचे बदलत्या काळाचे, काळानुसार बदलणाऱ्या मानवी वृत्ती—प्रवृत्तींचे आणि मूल्यव्यवस्थेचे चित्रण करते की नाही हे पहाणे म्हणजेच सामाजिक कादंबरीची योग्य समीक्षा करणे होय"[२] कादंबरीत गतिशील समाजाचे भान लेखकाने ठेवलेले असते. समाजातील परिवर्तने कादंबरीत येतात. मानवी प्रवृत्ती कशा बदलतात, याचे चित्रण कादंबरी करते. त्यामुळे कोणत्याही कलाकृतीची योग्य समीक्षा होणे महत्त्वाचे ठरते.

## २) 'वारुळ' मधील समाजदर्शन :—

कोणतीही कादंबरी एकाअर्थाने समाजिकच असते ती समाजदर्शन घडविते समाजदर्शन घडवित असताना तिच्यातून संबंधित अशा आशयसूंत्रांना ती स्पर्श करीत जाते. वास्तववादी आशयसूत्र, राजकीय आशयसूत्र, ऐतिहासिक आशयसूत्र परिवर्तनवादी आशयसूत्र, पौराणिक आशय आणि महत्त्वाचा सामाजिक आशय या कादंबऱ्यातून येतो. 'वारुळ' या बाबाराव मुसळेंच्या कादंबरीत समाजदर्शन तर घडतेच पण; निश्चित असा कालखंडही येतो. विदर्भातील ठिकाणांच्या संदर्भासहित 'वारुळ' अवतरते. जीवनात सहज अवतरावित अशी पात्रे, त्यांच्या कृती कादंबरीत येतात. विशेषकरुन यामध्ये मातंग समाजचित्रणावर प्रकाश टाकलेला दिसतो त्यांचे उद्योग, व्यवसाय, वेगवेगळया वयाची स्वभावाची माणसं 'वारुळ' मध्ये येतात. सामाजिक कादंबरी असल्याने तिच्या परिवर्तनशील गतिवर लक्ष दिलेले दिसते. काळानुसार, परिस्थितीनुसार मानवी वर्तनात होणारा बदल कादंबरीत चित्रित केलेला आहे. सामाजिक कादंबरीत अनेक छोटी—मोठी आशयसूत्र येतात. त्या आशयसूत्रांच्या सहाय्यान आपण 'वारुळ' मधील समाजदर्शन पाहू.

## २.१) मातंग समाज आणि आशयसूत्रे :—

'वारुळ' सामाजिक असून तिचे कथानक वास्तववादी आहे. कादंबरी समाजजीवनाची नोंद करीत असल्यामुळे तिच्यात समाजवास्तव येतेच. कादंबरीतील तपशिल सत्य आलेले आहेत. कादंबरीत देश स्वातंत्र्य झाला तरी जातीधर्म स्वातंत्र्य झाले नव्हते. ते सवर्णांच्या गुलमीत होते. या कादंबरीत मातंगांच्या तीन पिढयांचा वास्तववादी संदर्भ आला आहे. त्यांचे जीवनचित्रण देशात व जातींमध्ये होणार बदल हा वास्तववादी आलेला आहे. मातंग समाजाच्या प्रथापरंपरा (उदा. वाजविणे, गुढी मागणे, भाडोळा वाजविणे, पत्रावळया द्रोण तयार करणे.) बौध्दांनी सोडलेली कामे हा मातंग समाज स्वीकारतो. त्याला कारण मातंगांना धर्मांतरापेक्षा भूकेचा प्रश्न महत्त्वाचा होता. तसे मातंग हे आळशी आहेत. त्यांनी इतर कामं करावीत असे म्हटले तर शिक्षण व पैसा त्यांच्याजवळ नाही. त्यांची परिस्थिती आर्थिकता हलाखिची आहे. पहिली पिढी येसाजीची आहे तिला गावकीची कामे करायला लागतात. येसाजी येसकर असल्यामुळे हाप्त्याचा रिपोर्ट पोलीस स्टेशनला देतो. चहादू, यादव, तुळशीराम हे गावकीची येसकरकी करीत होते. त्या मोबदल्यात ते गावात भाकरी मागत होते. ढोर ओढणे, सोलणे तेच करत. कुणब्यांच्या शिळया पात्यावर जगायची सवय त्यांना लागलेली होती. कष्टांची कामे करणे त्यांना जमत नाही. या पहिल्या पिढीतले कोणीच शिकले नाही. शिकायची त्यांना संधी कधी मिळाली नाही. त्यांच्यावेळी महार—मांगांच्या पोरांना शिक्षणाची सोयच नव्हती. प्रत्येक घरात मुलांची संख्या जास्त होती. त्यांची घरे बसकी टीनाची, तुऱ्हाटयाच्या पऱ्हाटयाची आहेत. कुडामातीची घरे असून दारे खिडक्या या घरांना नाहीत. एकंदरीत मातंगांची आर्थिक परिस्थिती नाजूक आहे. आंबेडकर या पिढीला जवळचे वाटत नाहीत शिदनाक येसाजीला आंबेडकरांचे श्रेष्ठत्व व गावकीच्या कामातील लाचारी सांगतो, ती त्याला पटत नाही. उदा. "हे पहाय येसाजी, आज मी काय मनतो हे तुले पटणार नाही ..... पण नशिबांन जर तुले लांब्र आयुष्य भेटलं तं एक ना एक दिवस तुले हे पटंल की आंबेडकर बाबा एकटया आमच्या जातीचे नाहीत तुमचे आमचे सगळयाहयचे आहेत." (वारुळ पृ. क्र. १३)

रामायणातल्या मातंग ऋषींचा संदर्भ ही यांमध्ये येतो. त्याचे वारस म्हणून मातंगांना अभिमान वाटतो स्वत:ला ते पवित्र समजतात. अशाप्रकारे पौराणिक आशयही 'वारुळमध्ये येतो अनेक पौराणिक संदर्भ देऊन मातंगांच्या उत्पती विषयी लेखक सांगतात. कुणबी लोक मातंगांचे तोंड पहाणे शुभ मानत असले तरी ते त्यांचा बाट धरतात. पाटील कुणब्यांच्या शेतात त्यांना काम करावे लागते. उदरनिर्वाह त्यावरच त्यांचा चालतो. कुणब्यांच्या मर्जीने गावात त्यांना जगावे लागते. अशाप्रकारे सामाजिक सांस्कृतिक पारंपारिक जीवनदर्शन 'वारुळ' मध्ये येते. मातंग समाजात मुळातच एकी नाही. परस्परात कायम वैर असलेले दिसते. भिका नाथाच्या सनई—चौघडयांच्या जोडातून बाहेर पडतो. नंतर येसाजीला प्रत्येक कामात अडथळा निर्माण करतो. मातंग समाजातल्या स्त्रियांची गरोदरपणीची अवस्था अत्यंत वाईट आहे. त्यांना वेळच्या वेळी खायला मिळत नाही. तरी त्याचे त्यांना काहीच वाटत नाही सर्व गावावरच त्यांना मालकी वाटते. गावकीच्या कामात निरोप देणे, लाकडे फोडणे, कुणब्यांबरोबर माळी तेली यांचीही कामे त्यांना करावी लागत होती. मर्तिकांचे वाजवायलाही लागते.

प्रभू गणा ही मातंगांची दुसरी पिढी आहे. ही पिढी शिकते सवरते समाज प्रगति साधण्याचा प्रयत्न करते. नोकरी व्यवसायाकडे वळते. प्रभू कोतवाल होतो तर गणा बँड घेतो. सवर्णांचा या पिढीला राग येतो. कुलकर्णी मास्तर सारखे लोक त्यांच्यावर चांगले संस्कार करतात. या पिढीला गावकीच्या कामातील लाचारी नको वाटते मांस खाणे ही पिढी सोडून देते. भाकरीच्या मोबदल्यांतील ढोरमेहनतीची कामे ही पिढी नाकारते. जातीयतेमुळे दलित शिक्षकांना गावातून हाकलून दिले जाते. कुणब्यांची घरे दिलतांपेक्षा मोठी असावीत असा नियम होता. या पिढीला फुले, आंबेडकर अधिक जवळचे वाटतात. समाजाला शिक्षणाचे महत्व पटवून दिले जाते. समाज उत्कर्षासाठी प्रयत्न केले जातात. महाराष्ट्रातील दुष्काळाची झळ मातंगांनाही बसते. प्रभूला नोकरीमुळे झळ बसत नाही. दुष्काळात मातंग लोक निर्णय एकत्र येऊन घेतात. ही पिढी थोरा—मोठयाच्या आज्ञेत राहाते. डॉ. भोपळे व त्यांच्या अ. म. मातंग संघाची ओळख या पिढीला होते. म्हणजे ही पिढी परिवर्तनवादी चळवळीत पडते. तायडे गुरुजींचे त्यांना मार्गदर्शन लाभते. समाजाचा

विकास साधण्याचा प्रयत्न केला जातो. याच्याच माध्यमातून समाजकारणाबरोबर गावपातळीवरील राजकारणात सरपंचपदाच्या निवडणूकीत सहभागी होऊन समाजातील आपले स्थान सवर्णांना सांगते समाजाचा आर्थिक, सामाजिक, सांस्कृतिक विकास करते. मातंगांचा एक सदस्य गजूला सर्वानुमते निवडून देतात सरपंचपदासाठी याचा कोणाला पाठींबा हवा असेल त्याच्याकडून जास्तीत जास्त रक्कम वसूल करतात. व त्यातून समाजमंदिर बांधण्याचा त्यांचा संकल्प असतो. अशा रितीने त्यांच्यात परिवर्तनाबरोबर राजकारणात प्रवेश होतो. त्यामुळे कादंबरीत परिवर्तनावादी, राजकीय आशय येतो. हीच पिढी समाजाला विकासाच्या मार्गाने लावते गावकीच्या कामावर बहिष्कार टाकायला लावते.

या समाजाची तिसरी पिढी बुध्दीमान आहे. उच्च शिक्षण घेऊन समाजातील परिवर्तने हेरते व समाजपरिवर्तनास तयार करते. संतोष प्रभूचा मुलगा हा या पिढीतला आहे. या पिढीपर्यंत अस्पृश्यतेची वागणूक मिळते. तरी ही पिढी परिवर्तनात पडलेली होती. ब्राम्हण मराठा मुले त्यांच्या शेजारी बसत नाहीत. संतोषाचा वर्गात पहिला नंबर येतो. बक्षिस मिळते. आईची लोकगीते लिहून घेऊन येतो.

अशाप्रकारे वास्तवादी कादंबरी म्हणून वास्तव आशय संदर्भासहित यात येतो. सामाजिक वास्तवही यात येते. राजकीय, ऐतिहासिक म्हणजे मातंगांच्या तीन पिढयांचा तपशिल कादंबरीत येतो. परिवर्तनवादी चळवळीचा परिवर्तनाचा आलेख या कादंबरीत रेखाटला आहे. म्हणून मातंग समाज व इतर आशयसूत्र यांना स्पर्शून येणारा आशय याचे दर्शन कादंबरीत घडते.

## २.२) बौध्द समाजदर्शन व आशयसूत्रे :—

मातंग समाजदर्शनप्रमाणे विविध आशयसूत्रांना स्पर्श करुन 'वारुळ' मधील बौध्द समाजाचे चित्रण जाते. मातंगांबरोबरच अल्पसेच परंतु प्रभावी दर्शन यामध्ये घडते. दीक्षा घेण्या अगोदर बौध्द गावकीच्या कामात अखंड बुडलेले होते. हीन, हालकी—सलकी कामे त्यांना करावी लागत होती. स्वतंत्र्यानंतर १९५६ साली आंबेडकरांच्या नेतृत्वाखाली नागपूरला त्यांनी बौध्द धर्माची दीक्षा घेतली व त्यांनी

गावकीच्या कामावर बहिष्कार टाकला. 'शिका, संघटीत व्हा, संघर्ष करा' या उपदेशाचा त्यांनी काटेकोर अवलंब केला. त्यांची उन्नती झाली. त्यांच्यात परिवर्तनाचे चैतन्य निर्माण झाले. आंबेडकरांनी बौध्दांबरोबर मातंगादी इतरही + दलितांना परिवर्तनात सहभागी होण्याचे आव्हान केले. परंतु मातंग लोक आंबेडकर बौध्दांचे म्हणून त्यात सहभागी झाले नाहीत. परिणामी त्यांचा शैक्षणिक, आर्थिक, सामाजिक, सांस्कृतिक विकास २०—२५ वर्षे उशिरा झाला. त्यासाठी त्यांना इ. स. १९८२ हे साल उजाडावे लागले व अ. म. मातंग संघाच्या रुपाने डॉ. भोपळेंच्या नेतृत्त्वाची त्यांना वाट बघावी लागली.

बौध्द शिकले सवरले आंबेडकरांनी त्यांच्यासाठी शैक्षणिक सुविधा, सोयी उपलब्ध करुन दिल्या त्याने त्यांच्यात सामाजिक परिवर्तन होऊ लागले. शिक्षणांने त्यांनी उच्च अधिकाऱ्यांच्या नोकऱ्या मिळविल्या. हक्कांसाठी त्यांनी संघर्ष केला. कुणब्यांना ते जुमानिनासे झाले. दीक्षा घेतल्यानंतर कुणब्यांनी त्यांच्यावर सात वर्षे बहिष्कार टाकला. त्याला त्यांनी एकजुटीच्या बळावर तोंड दिले. वडगावचा शिदनाकं हा बौध्दांचा प्रमुख होता. पडीच्या हिंस्यापासून ढोर ओढणे, सोलणे ही कामे तोच करीत होता. दीक्षा घेतल्यानंतर शिदनाकाचा शिदाजी होतो. त्याच्या वागण्या बोलण्यात बदल होतो. येसाजीला शिदनाक व त्याचे बोलणे आवडत नाही. पूर्वी बौध्द पडीचे हिस्से टाकीत त्यावेळी मांस मिळावे म्हणून मातंग लोक शेजारी आशा लावून बसून तेव्हां हाच शिदनाक मातंगांची हेटाळणी करायचा खराब झालेल मांस तो मातंगांना दयायचा.

गावकीच्या कामातील लाचारी शिदनाक येसाजीला सांगतो. ते त्याला पटत नाही आंबेडकर बौध्दांचे म्हणून मातंगांना व येसाजीला या गोष्टी फालतु वाटतात. धर्मांतरापेक्षा मातंगांना भूकेचा प्रश्न महत्त्वाचा त्यावेळी वाटत होता. बौध्द ग्रामपंचायतीच्या सरपंचपदासाठीच्या निवडणूकीत भाग घेतात राजकीय आशय हा बौध्दांच्या समाजदर्शनात महत्त्वाचा ठरतो. सरपंच पदासाठी जो उमेदवार बौध्दांच्या दोन सदस्यांच्या मताची किंमत जास्तीत जास्त देईल, त्याला मते देण्याचा विचार बौध्द करतात. विनायक पाटील स्वत:ला सरपंच होण्यासाठी या दोन सदस्यांच्या मताच्या मोबदल्यात आंबेडकर पुतळा व उपसरपंचपद देतो. बौध्द आंबेडकर पुतळा

कुणब्यांच्या पोळा भरविण्याच्या जागी उभा करण्यासाठी चबुतरा बांधतात. कुणबी त्याला विरोध करतात व चबुतऱ्याचे बांधकाम पाडतात. बौध्दांना मारहान केली जाते. कोर्टात केस उभी राहाते. सेव्हन. पी. सी. आर कायदयांने बौध्दांना संरक्षण मिळाल्याने कुणब्यांना बौध्द सांगतिलं त्या अटी मान्य कराव्या लागतात. पुतळा त्याच जागी उभा करण्यास परवानगी देतात.

तहसिलदार, न्यायाधिश या पदावर बौध्द लोकांची माणसे असल्यामुळे बौध्दांसारखा निकाल प्रत्येक केसचा लागतो. एकंदरीत यामध्ये बौध्दांच्या दीक्षा घेण्याअगोदरचे जीवन नंतरचे जीवन समाजवास्तव प्रत्येक आशय विषयासह यात अवतरते. सामाजिकता, राजकीय, ऐतिहासिक तसेच परिवर्तनवादी आशयाला जवळून जाते. बौध्दांचे समान दर्शन या आशयसूत्रांच्या संबंधित असल्यांमुळे बौध्दसमानदर्शनाचा आढावा घेताना महत्त्वचे वाटते.

## २.३) कुणबी समाजदर्शन व आशय सूत्रे :—

दलित ग्रामीण साहित्याचा सीमारेषेवर ही कादंबरी असल्याने ग्रामीण गावगाडा यात येतो. गावचे पाटील सिदाजी पाटील हे श्रीमंत आहेत. ते अस्पृश्यता पाळीत नाहीत सर्वांशी ते प्रेमाने वागत. त्यांच्या घरी बौध्द—मातंगांचे बसणे—उठणे असते. प्रामुख्याने मातंगांच्या खालोखाल कुणबी दर्शन वास्तववादी आशय रुपाने येते. येसाजी गावकामदार असल्याने त्याचे जाणे येणे पाटलांच्या घरी असते. पाटीलांच्या विचाराने तो निर्णय घेतो. पाटलांचा मुलगा देवबा पाटील व यांचा मुलगा भगवान पाटील. देवबा पाटील ऐन जवानीत टी. बी. च्या आजाराने मरतो हे भगवान पाटलांचे आजोबा सिध्दांजी पाटील हे पैलवान होते. सिदाजी पाटलांच्या नावाने वडगावला ओळखले जात होते. कुणब्यांची ही पहिली पिढी. त्याच्या घरात पूर्वीपासून गावची पाटीलकी होती. दीक्षा घेतल्यानंतर बौध्दांच्या वागण्यात बोलण्यात फरक पडतो. त्यामुळे पाटील त्यांच्यावर बहिष्कार टाकतात. कुणब्यांना मातंग—बौध्दांचा बाट होतो. पूर्वीपासूनच दोन जातींकडे बघण्याचा दृष्टीकोण हीन पणांचा आहे. भगवान पाटील, सिदाजी पाटील यांचा गावावर वचक होता. आपल्या घरांपेक्षा बौध्द—मातंगांची घरे मोठी नसावीत असे कुणब्यांना वाटते.

दलितांना कुणबी हे अपमानित जीवन जगायला लावतात गवना—साधना भांडणात गवनाला मारुन तिला व यंकाला गणासहित बँडवाल्या सोबत्यांना वऱ्हाडाच्या ट्रकमध्ये बसता येत नाही. 'मांगे हो' म्हणून त्यांना हिणवले जाते. दलितांना सवर्णांकडून मिळणारी आपमानित वागणूकीचा इतिहास 'वारुळ' मध्ये येतो. सामाजिक, आर्थिक, धार्मिक आक्षयाबरोबर कुणब्यांच्या इतिहासाच्या आशयाचा मागोवा यामध्ये घेतलेला आहे.

सरपंचपदाच्या निवडणूकीसाठी विनायक पाटील बौध्दांच्या दोन सदस्यांच्या मोबदल्यात त्यांना पुतळयाबरोबर उपसरपंचपद देतो. पुतळा उभारण्यावरुन कुणबी बौध्द संघर्ष टोकाला जातो. कोर्टात त्याची केस पडते. सेव्हन सी. पी. आर कायदयाने बौध्दांसारखा त्याचा निकाल लागतो. कुणब्यांना बौध्दांच्या ते सांगतील त्या अटी मान्य कराव्या लागतात. व पुतळाही त्याच ठिकाणी उभारायला परवानगी दयावी लागते. विनायकाने बौध्दांना पुतळा देऊन गावात भांडणे लावली, असे कुणब्यांना वाटायला लागते. या केसचा भांडणाचा विनायकानही त्रास होतो. केसपुरते सगळे कुणबी एकत्र येऊन वर्गणी काढून केस लढतात. पण, त्याचा उपयोग होत नाही. सरपंच पदासाठी व पाटीलकीसाठी लिंबा बेले, राजाराम मास्तर हे गावात त्रासदायक राजकारण करायला लागतात. गणा त्यांना सोबती असतो. अ. म. मातंग संघ, वडगावचा अध्यक्ष असून गणा आपल्या जातीबांधवांना मदत करीत नाही. अशाप्रकारे गावपातळीवरील राजकाराणात कुणबी हे सहभागी आहेतच परंतु स्वत:च्या स्वार्थासाठी ते बौध्द—मातंग यांचा वापर करुन घेतात. मास्तर असूनही राजाराम गणाच्या लहान भावतयी मीराबरोबर अनैतिक संबंध ठेवतो. त्याचा राग गणाला, भिकाला येतो.

निवडणूकीत स्वत:ला मताचा जास्तीत जास्त पाठींबा मिळविण्यासाठी दुष्काळात स्वत:च्या विहिरीचे पाणी इंजिन लावून लिंबा बेले बौध्द—मातंग यांच्याबरोबर गावाला पुरवितो. दुष्काळात ज्वारी, बाजरी असे वाटून लोकांना मिंधे करण्याचा त्यांचा प्रयत्न करतात. कसेही करुन आपल्याला सरपंचपद मिळावे. अशी त्यांची धारणा होती. दारु मटनाचा वापर केला जातो.

सदाशिव बेले मारुतीच्या पारावर शाळा भरु देत नाही. कारण महारामांगांच्या मुलांमुळे देव बाटेल असे त्याला वाटते. लग्नात बँड वाजविला नाही म्हणून विकास बेले वाशिमला आपल्या लोकांकरवी गणाला मारतो. मातंगांना आपल्या घरातल्या व शेतातल्या कामावर राबविले जाते. त्याचा अल्पसा मोबदला दिला जातो. 'वारुळ' मध्ये कुणबी–दलित संघर्ष चितारला आहे. वास्तवादी सामाजिक ऐतिहासिक दृष्टीने येतो. सर्व संदर्भांना आशयाला 'वारुळ' मध्ये स्थान असल्याने या मध्ये समाजातिल सर्व घटकांना बरोबर घेऊन यातील आशय जातो.

अशा प्रकारे 'वारुळ' मातंग–बौध्द–कुणबी यांचा संघर्ष येतो. त्याबरोबर त्यांचे समानदर्शन विविध आशयसूत्रांच्या सहाय्याने घडविले आहे.

## ३) 'वारुळ' ची निवेदन पध्दती :–

कादंबरी हा निवेदन प्रधान वाङ्.मयप्रकार आहे. कादंबरीला कथानक असते. कथानक निवेदन या प्रस्तुतीकरण पध्दतीद्वारे सांगावे लागते. निवदेनासाठी कधी प्रथमपुरुषी निवेदनाचा वापर केला जातो. तर कधी तृतीय–पुरुषी निवेदनाचा वापर केला जातो. निवेदन हे कथानकातील सर्व घटना प्रसंग यांना धरुन येते. म्हणून त्यात वर्णन असते. पात्रा–पात्रात संभाषण असते. कधी एकाच पात्राच्या मनातील स्व–भाषण असते. निवेदनात घटना प्रसंगावरची भाष्ये असतात. कथानकात या सर्व प्रस्तुतीकरणाच्या पध्दती एकमेकांच्या हातात हात घालून येतात. अशा प्रकारे निवेदनाचे विविध प्रकार असतात. प्रथम पुरुषी निवेदनात स्वत:निवेदक पात्र निवेदन करते. तर तृतीयपुरुषी निवेदनात स्वत: निवेदक लेखक किंवा कोणीही असू शकतो तृतीयपुरुषी निवेदनात स्वत: निवेदक लेखक किंवा कोणीही असू शकतो. तृतीयपुरुषी निवेदक पात्राने निवेदन केले जाते. पत्र दैनंदिनी यांच्याद्वारे कथानकाचे निवेदन केले जाते. तृतीयपुरुषी निवेदक, एकप्रकारे सर्वज्ञ व सर्वसाक्षी असतो. सर्व घटनाप्रसंगांच्यावेळी तो जणू काही उपस्थित असतो. पात्रांच्या अंत:र्गत हालचालीही त्याला कळत असतात. प्रथम पुरुषी निवेदनात निवेदकाच्या चिंतलाला व अंतर्मुखाला अधिक वाव असतो. कादंबरीतील प्रसंगचित्रण, पात्रचित्रण त्या पात्राचे स्वभाव वृत्तीप्रवृत्ती इ. बाबींना जे महत्त्व प्राप्त होते ते निवेदनामुळे प्रथमपुरुषी किंवा

आत्मानिवेदन या पध्दतीमध्ये कादंबरीतील पात्राने विशेषत:नायक, नायिका अथवा एखादया मध्यवर्ती पात्राने स्वत:च आपली कथा—व्यथा सांगणे या पध्दतीमुळे भावानुभूतींची जितक्या तीव्रतेने जाणिव होते. तितक्या तीव्रतेने तृतीय पुरुषी निवेदनातून होत नाही. निवेदनामुळे कादंबरीला गती व लय येते.

'वारुळ' चे निवेदन कथानकाला योग्य अशी गती देते. यामध्ये तृतीयपुरुषी निवेदन पध्दतीचा वापर केलेला आहे. लेखक स्वत:च निवेदन करीत असल्याने तो या ठिकाणी सर्वज्ञ ठरतो. अनेक छोटे—छोटे घटना प्रसंगा मध्ये सांगतो. आपल्याला घटनाप्रसंगांची रेलचेल झालेली वाटते; पण कथानकाला गती देण्यासाठी अनेक पात्रे व प्रसंगांचा लेखक वापर करतात. 'वारुळ' दलित—ग्रामीण साहित्याच्या सीमारेषेवर लिहिलेली असून तिचे कथानक सलग आहे. कादंबरी दोन भागात विभागलेली असून तिची पृष्ठसंख्या ४९१ इतकी आहे. कादंबरी पृष्ठसंख्येने जशी मोठी आहे तशीच तिचा अवकाशही मोठा आहे. स्वातंत्र्यप्राप्तीनंतर दलित समाजात होणारा बदल ती नेमकेपणाने आपल्याला सुचविते दलितांना स्वत:च्या हक्कांची झालेली जाणिव बौध्द—मातंग—कुणबी यांमधला संघर्ष, परिवर्तनवादी चळवळींचा व्यापक पट तंत्राच्या अंगाने सहज सामावण्यात मुसळेंना यश आले आहे.

या कादंबरीत प्रभूची व्यक्तिरेखा प्रमुख आहे. तो नायकाच्या भूमिकेत कादंबरीभर वावरतो. त्याच्या जिवनाचे चित्रण त्याच्या लहानापासून ते परिवर्तनवादी चळवळीच्या माध्यमातून मातंग समाजाचा विकास करु पाहणारा एक सच्चा नागरीक इंथपर्यंत लेखक करतात त्याचा स्वभाव अत्यंत प्रामाणिक, नम्र संयमशील आहे तो समाजाचे हित व विकास बघणारा आहे. त्याच्या मनात सवर्णांविषयी राग आहे. कारण कुणबीही माणूस आहे आणि मातंगही पण सवर्ण त्याच्याशी माणूस म्हणून वागत नाहीत. प्रभूला स्वत:च्या जातीच्या नशिबी आलेले दु:ख दैन्य, दारिद्रया विषयी प्रश्न पडतो की हे आपल्याच नशिबी का? कांदबरीत पौराणिक दाखले दिलेले आहेत. मातंग ऋषीचा महिमा सांगितलेला आहे. प्रभूला या सर्व गोष्टी फोल वाटतात. देवदैवतांविषयी त्याचे मत बदलते. स्वत:चे तो आत्मपरिक्षण करु लागतो. प्रभू व या कादंबरीतील पात्रे आपल्याशी वासिम—अनसिंग—अकोला या भागातील विदर्भातल्या वऱ्हाडी बोली भाषेत बोलतात. संवाद साधतात. या बोली

भाषेला तेथील प्रादेशिक निसर्गाची सहज जोड लाभलेली आहे. बोलीभाषेवरुन तेथील निसर्ग आपल्यासमोर सहज उभा राहतो. ही कादंबरी 'वडगाव' या गावात घडते त्या आजूबाजूचा सभोवतालचा परिसर कादंबरीत सामावतो. बौध्दांचे मातंगांचे जीवन चित्रण आपल्याला कादंबरीत पहावयास मिळते. दलितांना शिक्षणाची सोय नव्हती स्वातंत्र्य प्राप्तीनंतर त्यांना शिक्षण मिळू लागले कादंबरीच्या सुरुवातीलाच प्रभू वर्गात बसलेला आहे. कुलकर्णी मास्तर त्याला शिकवितात. त्याला प्रश्न विचारतात. 'भारताला स्वातंत्र्य केंव्हा मिळाले? त्यावेळी प्रभूचे लक्ष पुस्तकातील '१५ ऑगस्ट १९४७ ...' यावर स्थिरावते इथे मुसळे प्रथमच सूत्रधाराची भूमिका स्वीकारतात. नंतर बायजा व प्रभू यांचे संवाद आहेत. बायजाला प्रभू विचारतो. 'माय माझा जन्म केंव्हा झाला? तिला सांगता येत नाही. कुलकर्णी मास्तर देश ज्या वर्षी स्वातंत्र्य झाला त्यावर्षीच प्रभूचा जन्म झाल्याचे सांगतात. देशाबरोबर तोही स्वातंत्र्य झाल्याचे सुचवितात.

"लक्षात ठेव तुझा जन्मही १९४७ सालीच झालेला आहे. यावर प्रभू आईला विचारतो माझा जन्म कधी झाला?"

'मा. माहा जन्म कव्हा झाला कोणत्या साली?'

'साल गिल मले नाही समजत बाबा .... तू अन् संतराममामाची गोधी एकाच साली जन्माले आले .... तुमच्या दोघांत दोन महयन्यांचचं अंतर हाये (वारुळ पृ. क्र. ७) या प्रसंगात दलितांना कुठेतरी शिक्षणाची मिळालेली संधी दिसून येते. प्रभूला आपल्या जातीविषयी कायम प्रश्न पडतो. सवर्णाबद्दल राग येतो. भोसले मास्तर महारा–मागांच्या मुलांना शाळेत घेत नाहीत. उलट ब्राम्हण असूनही कुलकर्णी मास्तर तसे करीत नाहीत. प्रभूचे नाव प्रथम हेच मास्तर घेतात यातून स्वातंत्र्यप्राप्तीनंतर दलित मात्र स्वातंत्र्य झाले नव्हते हेच मुसळेंना इथे सुचवायचे आहे.

कादंबरीत ग्रामीण गावगाडा येतो. पाटलांच्या श्रीमंतांचे दर्शन घडते. बौध्दांनी दीक्षा घेतल्यानंतर गावकीच्या कामावर त्यांनी बहिष्कार टाकला मातंगांनी हीच गावकीची कामे स्वीकारली. कारण मातंगांना फुकटची पड खायची सवय लागलेली होती. बौध्द धर्मात जाण्यापूर्वी बौध्द लोक पडीचे हिस्से मिळावा म्हणून मातंग

अशा धरुन उभे असायचे त्यांना वाटायचे कसेही करुन हे काम मिळावे येसाजीच्या माध्यमातून लेखक हा प्रसंग निवेदन करुन सांगतात. मातंगांनी गावकीची कामे वाटून घेतली होती. येसाजी तालुक्यांच्या गावी हप्त्याचा रिपोर्ट पोलीस स्टेशनला देतो. चहादू, यादव, तुळशीराम येसकरकीच्या भाकरीच्या मोबदल्यात गावकीची कामे करीत होते. नाथा, हारजी, भिका, संपत ही मंडळी मेलेलं ढोर ओढणे, सोलंणे ही कामे करीत. कादंबरीत हे प्रसंग अतिशय जिवंत वाटतांत. 'पड आली रे आली' की मातंगांमध्ये चैतन्याचे वातावरण निर्माण होते. गावकीच्या कामातली लाचारी येसाजीला शिदनाक सांगतो पण त्याला ते पटत नाही मातंगांना पोटासाठी गावकीची कामे सोडावी वाटत नाहीत. शिदनाक येसाजीला म्हणतो. "तूं म्हणतं ते खरं हाये पण एक ध्यानात ठेव ज्या चिखलात आम्ही इतके दिवस लोळलो; त्यो चिखल तुम्ही तुमच्या हातानं अंगावर लेपून घेयाले; पण एक दिवस तुमच्या नशिबी असा येईल आंबेडकरबाबाचं नाव सांगत आंबेडकरबाबा सारखाच एखादा बाबा तुमच्या जातीतून पुढं येईल अन् त्या तुम्हाले हे समदे कामं सोडायले सांगेल तसं झालं तं आपण दोघं एकमेकाले भेटून आजच्या आपल्या बोलण्याची आठवण देऊ अन् आपण जित्ते राहयलो नाहीत मंग ... " (वारुळ पृ. १३, १४)

मातंगांना बौध्द शत्रू वाटतात तर मातंगांना बौध्द हलके समजतात त्यामुळे वरील संवादातून शिदनाकाच्या बोलण्यातून दोन्ही जाती हलक्या असल्या तरी त्यामध्ये श्रेष्ठ—कनिष्ठतव आहे. सवर्णाच्यापुढे या दोन्ही जाती हलक्याच होत्या प्रत्येक गावाची रचना पारंपरिकतेनुसार आहे. गावची रचना, जातीभेद श्रेष्ठ — कनिष्ठत्त्व इ. गोष्टी विषयी प्रश्न येसागीला कायम पडतो त्याचे बसणे—उठणे चांगल्या लोकांत असल्याने त्याच्या भाषेत फरक पडतो त्याचे साथीदार ग्रामीण बोलतात.

कुलकर्णी मास्तरांना महारा मांगांच्या पोरांचा बाट वाटत नाही एकूण कादंबरीत त्यांची व्यक्तिरेखा मानवतावादी आहे. त्यांच्या तोंडचे निवेदन मुसळेंनी मराठी प्रमाण भाषेत दिलेले आहेत. मारुतीच्या मंदिरात शाळा भरवावी यासाठी कुलकर्णी मास्तर प्रयत्न करतात तर त्याला भोसले मास्तर विरोध करतात. कुलकर्णी मास्तरांच्या संवादावरुन प्रभूच्या घरची परिस्थिती समजते. सिदाजी पाटील

बौध्दांवर बहिष्कार टाकतात त्याला बौध्द जुमानित नाहीत. कारण परिवर्तनाच्या चळवळीमुळे त्यांच्यात बळ आलेले आहे. पहिल्या पिढीचा इतिहास लेखकांच्या साध्या सोप्या निवेदनातून कळतो. दुसऱ्या पिढीची इतिहास लहान मोठया प्रसंगात पाठीमागील दाखले देऊन लेखक सांगतात. दीक्षा घेतल्यापासून बौध्दांचं राहण्या बोलण्यात बदल होतो. त्या अगोदर पांडनाक पाटलांना म्हणतो.

"पाटील आम्हाले काय कमी हाये हो ... ? या गावावर जे जे कांही असंल ते ते सारं आमचंच ना?"

'ते कसं काय रे ?'

"अहो तुमच्याच मेलेल्या ढोराची बोटी तुमच्याच गव्हाची रोटी अन् ते भाजायले तुमच्याच कुपाटी काटी ... मंग सांगा काय कमी हाये, आम्हाले? गाव तालेवार मनून आम्ही तालेवार, गाव दुबळा तं आम्हीबी दुबळे." (वारुळ पृ. ३४) यातून परिवर्तन आणि बौध्दांनी गावाला केलेले आव्हान हे या निवेदनातून कळते. बौध्दांप्रमाणे मातंगही परिवर्तनाच्या दिशेने वाटचाल करतात. बौध्दांसारखे वागणे, बोलणे आता मातंगांचे होईल असा आशावाद लेखकांनी निवेदनातून सांगितला तो परिवर्तनात मातंग पडल्यानंतर खरा ठरतो.

ग्रहण, भाडोळा मागण्याचा अधिकार त्याचा इतिहास पौराणिक संदर्भाबरोबर कादंबरीत येतो. लग्न समारंभात वाजविण्याचा पारंपारकि व्यवसाय होता त्याचा संदर्भही नाथा, भिका यांच्या भांडणातून समजतो. मातंगांच्या घराची पावसाने झालेली दैना त्यांच्या दारिद्रयाचे द्योतक असलेले दिसते. त्याचे चित्रण मुसळे साजेसे करतात. गरोदर स्त्रियांची परिस्थिती लेखक समर्पक व नेमक्या शब्दांत मांडतात प्रभू वाजवायला गेल्यानंतर त्याला मिळणारी वागणूक वाईट आहे. त्याने त्याला राग येतो, वयाने लहान आहे दहा ते बारा वर्षाच्या प्रभूला जेवणाच्या पत्रावळीत आंबेडकर, फुले दिसतात त्यावेळी निवेदन प्रचारकी थाटाचे वाटू लागते. कादंबरीत 'गणा—प्रभू' यांच्या मुख्य संघर्ष दाखविला आहे. त्या संघर्षात इतरांचा निरनिराळया कारणांनी संबंध येत राहातो.

स्त्रियांच्या तोडंची भाषाही रसरशीत जिवंत वाटते. रखमाईचा राग पुढीलप्रमाणे व्यक्त झाला आहे. "अरे माहा नवरा माराय टेकला. चार झणहयचे

दरवाजे म्या, पैशासाठी झिजवले पण माहया भायासगट एकानंबी माझ्या कपाळाला लवायले एक रुपया देला नाही". (वारुळ पृ. ११४) गवना साधना भांडणात साधना गवनाला म्हणते "याद राख मनावं रांडं, आजच्या आज पैसे नाई देले तं उद्या तुहा मुडदाच पाडतो" (वारुळ पृ. २००) अशाप्रकारे निवेदनातून स्त्रियांच्या तोंडची भाषा लेखकांनी सांगितली आहे. काही ठिकाणची भाषणवजा निवेदन शैलीने औचित्यहानी झालेली आहे. कांही ठिकाणी प्रचार की थाटाचे निवेदन येते. १९७० सालच्या दुष्काळाचे मुसळेंनी केलेले निवेदन अत्यंत जिवंत आहे. "सगळया मांगांचे हात आभाळातल्या देवासाठी जोडले जात आभाळातल्या देवाचा पान्हा आटला ... दिवाळी आली तरी एकही ढग आभाळातून फिरकला नाही ... दिवाळीत दिव्याचा उजेड पाडण्याऐवजी दिवसा उजेडी अंधार पडायची वेळ आली" (वारुळ पृ. १४९) त्याचप्रमाणे आंबेडकर पुतळयावरुन कुणबी—बौध्द वादाचे चित्रण त्या प्रसंगाला साजेसे मुसळे करतात.

कादंबरीची निवेदनशैली वाचकांना जागे ठेवते तायडे गुरुजींनी केलेले बौध्दांच्या शिक्षण व एकजुटी बद्दलचे निवेदन आस्सल वास्तववादी वाटते. अ. म. मातंग संघाच्या स्थापन विषयीचे निवेदनही वास्वतवादी आहे. बौध्दांची शैक्षणिक प्रगती आंबडेकरांचे श्रेष्ठतव यांचे निवेदन वेगवेगळया प्रसंगातून आणि पात्रांच्या तोंडून वाचकांना समजते. सवर्ण अस्पृश्य लोकांवर कसा अन्याय करतात याचे वास्तव व जिवंत चित्रण गवना—साधना भांडणाच्या प्रसंगातून केलेले दिसते. छोटया—मोठया प्रसंगातून मातंग कुणबी संघर्ष लेखक चित्रित करतात. मातंगात पडलेले फुट, राजकारण यावर तर मुसळेंनी विशेष भर दिलेला आहे. प्रभूला गावातलं राजकारण आवडत नाही. तरीही स्वत:चे अस्तित्व सिध्द करण्यासाठी तो राजकारणात उतरतो. त्याला कारण अ. म. मातंग संघाचे संस्थापक अण्णासाहेब भोपळे राजकीय पाठींबा मिळविण्यासाठी राजकारणात पडतात त्याचे चित्रण यामध्ये येते.

येसाजीला प्रभूपेक्षा चळवळींचे आकर्षण जास्त वाटते. कारण समाजकारण फक्त समाजहिताचे असते राजकारण नाही असे त्याला वाटते तायडे गुरुजी आपला समाज सुधारावा त्यांना अण्णाभाऊंची ओळख व्हावी म्हणून विशेष प्रयत्न

करतात. मातंग समाजाच्या मेळाव्याचे पत्रकातूनही फार मोठा भाग सांगितलेला आहे. त्यातून समाज प्रबोधनाचे काम कसे केले जाते. याची माहिती मिळते आडमुठया गणाला तायडे मास्तर सरळ करतात एका पत्रकात गणाचे नाव टाकतात. पाणीपाडया महाराजाला वाचवितात.

१९७१ च्या दुष्काळाचे निवेदन तृतीय पुरुषी निवेदनाचा एक उत्तम नमुना आहे.

"गावातल्या बहुतेक कुणब्यांनी आपापल्या शेतातले उन्हाळयातले उदीम आटोपले होते. आपापल्या परीने प्रत्येकाने पैशांची व्यवस्था करुन घरात बी—बीयाणे आणून ठेवले .... गेल्या वर्षी पेरण्याच्या वेळी पाऊस आला .... पिके उगवली .... वाऱ्यावर डोलू लागली .... पावसाची वाट पाहू लागली .... हलक्या रानाची पिकं माना टाकू लागली .... भारी रानाची तग धरुन होती .... पण त्यांची वाढ खुंटली होती. लोक धास्तावले .... देवाला 'पाऊस पाड' म्हणून हात जोडू लागले .... महादेवाला, मारोतीला भिजवू लागले". (वारुळ. पृ. १४४) दुष्काळावे सर्व महाराष्ट्र गांजला होता. लोकांची श्रध्दा म्हणून देवाला पाण्यात ठेवीत होते निसर्गाच्या पुढे मात्र कोणालाच जाता येत नव्हते. सरकारने दुष्काळ निवारण्यासाठी ग्रामपंचायत निवडणुका पुढे ढकलल्या होत्या. त्यावर उपाय म्हणून रोजगारे हमीची कामे लोकांना मिळत होती. त्याचे निवेदन कल्पकतेने लेखक मांडतात ... "दुष्काळाच्या एका फटकाऱ्यानं सगळे एका रांगेत उभे केले होते. इथं कोणी कोणापेक्षा श्रेष्ठ वा कनिष्ठ नव्हता ... सगळे सारखेच होते. फक्त मजूर हा काळावाच महिमा होता. ज्यांनी भावातल्या गरीबां—गरीबांवर सदैव अन्याय, आत्याचार केला. अस्पृश्यांना अत्यंत छळले, त्यांचा सदैव विटाळ मानला, त्यांना कधी मांडीला मांडी लावून बसू दिलं नाही. ते दुष्काळापुढे नमले होते, वाकले होते." (वारुळ पृ. १६३) दुष्काळाचे केलेले निवेदन जिवंत वाटते जणू काय तो दुष्काळ आपल्यासमोरच उभा राहतो. दुष्काळाचे निवेदन करताना मुसळेंनी राघोचे एक लोकगीत सांगितले आहे. जगात होणारा बदल त्यातून आपल्याला कळतो.

इंदिरा गांधीचय खूनाची घटना तिचे मुसळे यांनी साठे साहेबांच्या तोंडून केलेले निवेदन हे इंदिरा गांधीचे कर्तृत्वा, व्यक्तिमत्वच समोर उभे करते. "इंदिरा

गांधींचा खून झाला अन् देशातलं वातावरण बिघडलं. इंदिरा गांधी म्हणजे वाघीण होती. भारतातल्याच नाही तर जगातल्या भल्या–भल्याच्या तोंडच तिनं पाणी पळविळं. इंदिरा गांधी म्हणजे वाघीण होती. भारतातल्याच नाही तर जगातल्या भल्या–भल्यांच्या तोंडचं तिनं पाणी पळविळ. इंदिरा गांधी पंतप्रधान झाल्या अन् घरा–घरात बायकांचे उर भरुन आले." (वारुळ. पृ. २५८) इंदिरा गांधींच्या खूनाने सर्व देशात दंगली झाल्या. त्याचे पडसाद खेडेगावातही पडले. त्याचे वर्णन समर्पक प्रमाण भाषेत लेखकांनी केले आहे. बौध्दांच्या पुतळा प्रकरणाबाबत चर्चा रानात केली जाते त्याचेही निवेदन लिंबा बेल्याच्या तोंडून केलेले आहे. "गडेहो, मुद्दाम तुम्हाले सगळयाहयले इथं जागलीवर बलावलं याचं कारण .... ' लिंबा बेल्यानं बोलायला सुरुवात केली सगळे सावध होऊन त्याच्या बोलण्याकडे ध्यान देवून ऐकू लागले. आकटीच्या जाळात सगळयाचे चेहरे लालबुंद वाटत होते. त्यामुळे त्यांच्या चेहऱ्यावर पसरलेली चिंता मात्र झाकळून गेली होती." (वारुळ पृ. २६१) अंधारात सर्वजनांचे चेहरे त्याचा बोलण्याचा विषय हे निवेदनातून स्पष्ट होते. सिंधीच्या बनात मातंग स्त्रियां पन्हाळया काढायला जायच्या त्यांचेही निवेदन लेखकांनी वेधक केलेले आहे. त्यामुळे तेथील निसर्ग आपल्यासमोर उभा राहतो. "असं बन जवळपासच्या पाच पन्नास गावात कुठं ऐकिवात नाही. तुरळक इथं, तिथं शिंदीचे बूडखं दिसतील ... पण असं बन नाही दिसत" (वारुळ पृ. २६८) निसर्गाबरोबर मातंगाचा त्या बनात गुंतलेला जीव यावरुन समजतो. डॉ. भोपळे व त्यांचे कार्यक्रम यातून झालेली जाणिव जागृती याचे दर्शन घडते. मातंगांचे समाज प्रबोधन जिवंत वाटायला लागते. समाज सुधरणेचे त्यांचे प्रयत्न होतात. त्याचे दर्शनक घडते. निवेदनात गीतांचा वापर समर्पक केला आहे. तसेच निवडणूकीच्या वेळी दलितांवर सवर्ण दबाव आणतात स्वतःच्या स्वार्थासाठी त्याचे हक्क पायदळी तुडवतात त्यांच्याशी संघर्ष करतात तो संघर्ष निवेदनातून जिवंत वाटतो.

## ४) 'वारुळ' मधील संवाद :–

नाटक या वाङ्.मयप्रकारामध्ये संवाद हे अपरिहार्यपणे येत असतात. त्यामुळे संवादाशिवाय नाटकाला स्वतंत्र्य अस्तित्व प्राप्त होवू शकत नाही. थोडक्यात संवाद

हा नाटकाचा अविभाज्य भाग असतो. पण कादंबरी या वाङ्.मयप्रकाराबाबत मात्र आपल्याला असे म्हणता येत नाही. कादंबरीत संवादाची अवश्यकता असतेच असे नाही. परंतु कथानक व व्यक्तिचित्रण हया दोन्हींशी संवादाचा निकटचा संबंध असल्यामुळे कादंबरीत संवादांना स्थान मिळू शकते. मुसळे यांना 'वारुळ' मध्ये संवादाचा केलेला वापर कलात्मके आहे. तिच्यातील संवाद हे सामाजिकता प्रकट करणारे आहेत. मातंग समाजाचे संवाद बौध्द समाजातील तसेच कुणब्यचे संवाद यामुळे संवादांना सखोलता प्राप्त झाली आहे. संवादात परिणामकारकता येण्यासाठी विदर्भातील वासिम—अनसिंग भागात बोलल्या जाणाऱ्या वऱ्हाडी बोलीचा वापर केलेला आहे. प्रभू आणि त्याची आई बायजा यांच्यामधले संवाद याच भाषेत आहेत प्रभूच्या जन्मा विषयी

"मा, तसं काय सांगतं, साल सांग ना?'

'मी का तुहयासारखी शिकलेली थोडीच हाओ बाप्पा?'

'काऊन नाही शिकली?'

'आमच्या लहानपणी कहाची आली शाळा? खाजगी शाळा व्हत्या तव्हा. पण त्या पाटील—पांडयाहयच्या पोरायसाठी. मांगा महाराच्या पोरायले तिथं पाय टाकायची मुभा नव्हती.'

'अं, अशी कशी शाळा व्हती? आमंच्या शाळंत त मांगांचे, महारांचे पोऱ्हबी शिकतात.'

'हं आता शिकतात; पण तुव्हं नाव टाकतानी काय झालं व्हंतं, माहित हाये ?'

'काय झालतं?'

'त्यो भोसले मास्तर तुव्हं नावचं घेयेना.'

'काऊन' (वारुळ पृ. ८) अशा प्रकारे संवाद प्रसंगानुसार कादंबरीत येतात बोलीमुळे ते प्रसंग आपल्या समोरच उभे राहातात. योग्य तो परिणाम — कारकता साधली जाते. पडीचा हिस्सा आणायला निघालेल्या येसाजीला बौध्दांचा शिदनाक भेटतो. म्हणतो.

'काय येसाजी, कुठं निघाला लगबगीनं?'

'पडीचा हिस्सा आणाय चाललो

बोलतो बोलतो शिदनाकाला पुढं विचारलं 'येत तूं?'

'मी?' कपाळावर आटया पाडून शिदनाक बोलला.

'हा तू! येशिल तं तू मनशील त्यो हिस्सा देतो.

हिस्साच काय, तू मनशिलं, सगळं काळीजच दे तरी देतो; चाल येसाजीच्या स्वभावतला शिदनाकाबद्दलचा मिस्किलपणा या वरील संवादातून समजतो. मातंग बौध्द यांचे वैर या पडीच्या हिस्यावरुनच झालेले समजते. शिदनाक येसाजीला गावकीच्या कामातील लाचारी सांगतो. परंतु येसाजीला शिदनाक व त्याचे बोलणे अवाडत नाही. प्रसंगपरत्वे संवाद येतात त्यातून तो प्रसंग उठावदार होतो. कुलकर्णी मास्तरांच्या घरी फडे घेऊन गेलेला प्रभू मास्तर यांच्यातले संवाद

'काय रे, कशाचा विचार चालला?'

'अं हं, हयो आवाज ?'

'हयो अंहं हा' त्यानं चूक दुरुस्त केली.

'हा आवाज म्हणतोस? रेडिओचा.'

'रेडिओ?'

'हं. तू पाहिला नाहीस कधी?'

'नाही'

'ये इकडे! बघ कोनाडयात ठेवलेला रेडिओ' (वारुळ पृ. २४) या संवादातील कुलकर्णी मास्तरांच्या तोंडवी भाषा ही प्रमाण मराठी आहे प्रभू बोलताना चुकतो त्याची ते चूक दुरुस्त करतात. अशा प्रकारचे संवाद सर्व कादंबरीभर आले आहेत. बौध्दा धर्मांची दीक्षा घेण्याअगोदर बौध्दवाडयातील पंडनाक पाटलांना म्हणायचा. "पाटील आम्हाले काय कमी हाये हो ... ? या गावावर जे जे काही असंल ... ते ते सारं आमचंच ना?"

'ते कसं काय रं?'

'अहो तुमच्याच मेलेल्या ढोराची बोटी, तुमच्याच गव्हाची रोटी अन् ते भाजायले तुमच्याच कुपाटी काटी .... मग सांगा, काय कमी हाये आम्हाला? गाव तालेवार म्हणून आम्ही तालेवार, गाव दुबळा तं आम्हीबी दुबळे" (वारुळ पृ. ३४)

महास्मांगांचा गावच्या कुपाटावर शेतावर हक्क होता. याचे हया संवादातून दिसते बौध्दांप्रमाणेच मातंगांत सुध्दा असा फरक पडेल असे या संवादातून लेखकांनी सुचविले आहे.

लग्नात वाजंत्री म्हणून गेलेल्या प्रभूला पाहून बायकांना आश्चर्य वाटते. लहान वयात चांगली सनई वाजवितो नाथा त्याला कानात सांगतो.

'काका मंघा तुम्ही काय मनले व्हते?'

'कव्हा रे?'

'शेवंतीसाठी आपण नवरदेव मारोतीच्या पारकडे वाजवत नेत व्हतो तव्हा दृ डांडारिन ... डाडारिन असं काहीतरी मनले तुम्ही?

'ह, ते व्हय?'

'हं. डांडारनी मंजे काय?'

'डाडारंनी मंजे बायका.'

'काय? बायका?'

'हं'

'हयो कोण्या भाषेतला शब्द हाये बॉ?'

'आपल्याच भाषेतला'

'आपल्या मंजे?'

'आपल्या मंजे, मांगाच्या'

'मागंची अलग भाषा हाये?'

'पहयले व्हती आता आपण मराठीच बोलतो.'

'अस्सं हे तं मले आजच कळलं'

'तुलेच काय आपल्या जाणीच्या बऱ्याच माणसाहयले हे माहीत नाही, (वारुळ पृ. ७४) मातंग समाजाच्या वेगळया सांकेतिक परंतु व्यवसायातील शब्दही कांही संवादातून आलेले आहेत. नवीन शब्दे योजना ही मुसळेंची लेखनाची खासियत आहे. ज्या समाजाचे जाती—धर्मांचे वर्णन करतील त्या जाती धर्मातील भाषेचे शब्द ते वापरतात. त्याच लग्नात जेवणाच्या पंगतीत बसल्यानंतर आलेल्या अनुभवाने प्रभूची भूकच पळून जाते. बौध्दांना मातंगांचा बाट वाटतो त्याचे उदा.

"तुम्ही आम्हाले जेवायचं आवतन देलं ना?'

'हो'

'का आम्ही आमच्या मनानं आलो?'

'नाही'

'मंग आता आमचा अपमान काऊन करता?'

'कसा काय अपमान?'

'अपमान नाही तं काय?'

'अरे पण कसा ते तं सांग?'

'हे तिघंजण जेवाय बसले ते कोण हायेत?'

'ते वऱ्हाडासंगचे मांग हायेत'

'आम्ही कोण हाओ?" (वारुळ पृ. ७७) सेनगावची बौध्दांची व्यक्ती मातंग वाजंत्री आपल्या पंगतील बसले म्हणून त्याला त्यांचा बाट होतो. हे या संवादावरुन समजते व तो प्रसंग आपल्या समोरच जिवंत उभा राहतो. त्यापैकी आनंदाची बायको रखमाई दीराकडे आनंदाच्या औषधाला पैसे मागते. त्यावेळी तर वाऱ्हाडातील कुणबी माणसाच्या स्वभावाची वैशिष्टये कळतात.

ती म्हणते "पैसे माहयाच्यानं फिटले नाही तं पांढरीतलं अर्ध रान देईनं" यावर तो म्हणाला 'मले तुहया नवऱ्याची गरज नाही तं तुहया पांढरीचीबी गरज नाही.

'अहो, पण औषदपाणी बराबर नाही भेटलं तं .... '

'त्यो उद्या मेला तरी मले गरज नाही' (वारुळ पृ.११२) यावर रखमाला राग येतो ती जमीन महारा मांगाला विकण्याचा संकल्प करते. राजारामची गाय मरते त्यावेळी प्रभूला केशव गाय ओढायला बोलवतो त्यावेळी बायजा प्रभू यांच्यातले संवाद वाचकांचे लक्ष वेधून घेतात प्रभूचे गाय ओढण्यासाठी मन लागत नाही. प्रभूला मुलगा होतो. त्याची बायको कवठयाला बाळंतपणासाठी गेलेली होती. ही आनंदाची बातमी; नाथा — बायजा व येसाजीला सांगतो.

"अरे, काय गोष्टी चालल्या तुमच्या देर—भावजयीच्या?' येसाजी बाहेरुन येत म्हणाला.

'अरे, ये येसादा ... गोष्टीचं जाऊ दे तिकडं ... म्या एक गोड बातमी आणली'

'कहाची बॉ?'

'अरे, तूं आता आज्या झाला'

'काय? खरंच?' बातमी एकून येसाजीला स्वर्ग दोन बोटचं उरला.

'काय झालं?'

'पोरगं'" (वारुळ पृ. १२७) येसाजीला नातू होतो. त्याचा आनंद साजरा करण्यांसाठी मातंग लोक गुढी मागतात. डंबरकर गुरुजी त्याला नकार देतात पण त्यांचे कोणीच ऐकत नाहीत. प्रभूचा सनईचा जोड बंद पाडण्यासाठी गणा बँड घेतो. लग्नकार्यात सर्वजन बँडच लावतात. सनईला कोणी विचारीत नाही तो प्रसंग नाथा—पाटील यांच्या संवादावरुन आपल्याला कळतो.

" 'हं, मलेबी कळ्ळं ते गण्यानंच अनसिंगवाल्या हयले सुपारी देयाले लावली व्हती मनं तुमचा चौघडा कोणाले लावूच देयाचा नाही असा त्यानं पण केला मने.'

'खरं सांगू मालक, तसा पण करायची गरजबी नाही.'

'कशी काय?

'जे मरायला टेकलं त्याले मुद्दाम मारायची काय गरज?'

'मले नाही कळलं!'

'त्यात न कळल्यांसारखं काय हाये? अहो, गणानं बँड आणला असता का नसता बी आणला तरीबी आमचा चौघडा एक दिवस बंद पडलाच असता जुनं मनलं की कोणाले बी नकोच वाटते." (वारुळ पृ. १३८) या संवादातून गणाचा आठमुठेपण व नाथा, येसाजी या व्यक्तिंचा सुस्वभाव कळतो.

कुणब्यांनी बौध्दांवर बहिष्कार घातला तसा मातंगावर घातला तर, असा प्रभू तायडे मास्तरांना प्रश्न विचारतो व चर्चाही करतो त्या प्रसंगातून मातंगानाही परिवर्तनाच्या चळवळीत भाग घ्यावा लागणार याची जाणीव होते.

'त्यो उद्या मेला तरी मले गरज नाही' (वारुळ पृ. ११२) यावर रखमाला राग येतो ती जमीन महारा मांगाला विकण्याचा संकल्प करते. राजारामची गाय मरते त्यावेळी प्रभूला केशव गाय ओढायला बोलावतो त्यावेळी बायजा प्रभू यांच्यातले संवाद वाचकांचे लक्ष वेधून घेतात प्रभूचे गाय ओढण्यासाठी मन लागत नाही

प्रभूला मुलगा होतो. त्याची बायको कवठयाला बाळंतपणासाठी गेलेली होती. ही आनंदाची बातमी; नाथा—बायजा व येसाजीला सांगतो.

"अरे, काय गोष्टी चालल्या तुमच्या देर—भावजयीच्या?' येसाजी बाहेरुन येत म्हणाला.

'अरे ये येसादा .... गोष्टीचं जाऊ दे तिकडं ... म्या एक गोड बातमी आणली'

'कहाची बॉ?'

'अरे, तूं आता आज्या झाला'

'काय? खरंच?' बातमी ऐकूनं येसाजीला स्वर्ग दोन बोटचं उरला.

'काय झालं?'

'पोरगं'" (वारुळ पृ. १२७) येसाजील नातू होतो त्याचा आनंद साजरा करण्यांसाठी मातंग लोक गुढी मागतात. उंबरकर गुरुजी त्याला नकार देतात. पण त्यांचे कोणीच ऐकंत नाहीत. प्रभूच्या सनईचा जोड बंद पाडण्यासाठी गणा बँड घेतो. लग्नकार्यात सर्वजन बँडच लावतात. सनईला कोणी विचारित नाही तो प्रसंग नाथा—पाटील यांच्या संवादावरुन आपल्याला कळतो. "'हं, मलेबी कळंलं ते. गण्यानंच अनसिंगवाल्याहयले सुपारी देयाले लावली व्हती मतं. तुमचा चौघडा कोणाल लावूच देयाचा नाही असा त्यानं पण केला मने.'

'खरं सांगू मालक, तसा पण करायची गरजबी नाही.'

'कशी काय?

'जे मरायला टेकलं त्याले मुद्दाम मारायची काय गरज?'

'मले नाही कळलं!'

'त्यात नं कळल्यांसारखं काय हाये? अहो, गणानं बँड आणला असता का नसता बी आणला तरीबी आमचा चौघडा एक दिवस बंद पडलाच असता जुनं मनलं की कोणाले बी नकोच वाटते." (वारुळ पृ. १३८) या संवादातून गणाचा आठमुठेपण व नाथा, येसाजी या व्यक्तिंचा सुस्वभाव कळतो.

कुणब्यांनी—बौध्दांवर बहिष्कार घातला तसा मातंगावर घातला तर असा प्रभू तायडे मास्तरांना प्रश्न विचारतो व चर्चाही करतो. त्या प्रसंगातून मातंगांनाही परिवर्तनांच्या चळवळीत भाग घ्यावा लागणार याची जाणिव होते.

प्रभू म्हणतो. “मले नाही वाटत आपला समाज बहिष्कारात टिकाव घरुन राहील.

'तुमचं म्हणणं बरोबर आहे. त्याची कारणं सांगता येतील?'

तशी पाळीव काहाले येईल आपल्या समाजावर?'

'ते काही सांगू नका फार लवकर आपल्यालाही गावंवाल्यांच्या विरोधात संघर्षासाठी उभं राहावं लागणार आहे. आपल्यासाठी क्रांतीची मशाल घेऊन एक माणूसं येत आहे.'

'खरं मनता?'

'तुम्हाला कांहीच माहिती नाही?” (वारुळ. पृ. १९३)

यावरुन भोपळे साहेबांची संघटना विशद केलेली आहे. अ. म. मातंग संघचे भाकीत प्रभू—मास्तर यांच्या प्रस्तुत संवादातून कळते. संवाद अस्सल ग्रामीण भाषेला वऱ्हाडीचा साज असलेला दिसतो.

सवर्ण दलितांवर अन्याय करतात मातंगांच्या यंकाच्या गवनाला साधना मारते. त्यावेळी त्याचा रिपोर्ट दयावा का नको, हे विचारायला येतो. तेव्हाचे संवाद सवर्णांच्या मनात दलितांबद्दल अढी दाखवितात

“कोण रिपोर्ट देणार हाय मनतं पोलीस स्टेशनात?

'कोणीच देणार नाही.'

'मंग?

'देवावं का असं ईचारायले आलो व्हतो पाटील बुवाले?'

'बाबा मनून मंतात का, नसत्या भानगडीत पडू नका मनून?'

'हं'

'बाबाच्या बोलण्यावर ध्यान देऊ नको.

त्याहयचा काळ अलग व्हता, आताचा काळ अलग हाये. मले सांग, कोणी रिपोर्ट दयाले तयार हाये का तुमच्या मांगवाडयात. लिंबा विरुध्द?” (वारुळ पृ. २०९) विनायक पाटील लिंबाविरुध्द पोलीसात रिपोर्ट दया असा सांगतो. त्याला पैसे मी पुरवितो असे म्हणतो म्हणजे एकमेकांची भांडणे लावून देऊन मजा बघत बसण्याची त्याची भूमिका आहे. गणाचा आडमुटेपणा मास्तरांशी अण्णाभाऊंच्या जयंतीच्या वेळी घातलेली हुज्जत तशीत जिवंत वाटते.

"मास्तर, तुम्ही फक्त शाळंत पोरं शिकवायचं काम करा; मांगवाडयात आग लावायचे हे धंदे बंद करा.'

मास्तर त्यावर एवढेच म्हणाले.

'दादा आज तुम्हाला या गोष्टींचा राग यायला, पण पुढं एक दिवस असां येईल की मी जे केलं तेच बरोबर आहे हे असं तुम्हाला वाटेलं.'

'बस्सं करा, जास्तीचा शहाणपण शिकवू नका." (वारुळ पृ. २१७) प्रभू — गणा यांना एकत्र आणण्याचा तायंडे मास्तरांचा बेत गणा उधळून लावतो. अ. म. मा. संघ बडगावचा अध्यक्ष गणा वासिमच्या कार्यक्रमाची वर्गनी मागायला मित्रांना पाठवितो त्यावेळी त्यांना प्रभू चहासाठी थांबवितो तेव्हा गणा त्याला रागावतो.

'का रे काय केलं रे इतक्या वाढोळ? देले का नाही पैसे?'

'गणा, पैसे तं भेटलेच; पण चहा बी भेटला?

'काय पोटलावगण्या हायेस रे लेका? तुझ्या बापानं कव्हा चहा पाहयलांच नव्हता का? मले मनला असंता तं गुंडीभर चहा वतला असता तुहया तोंडात शेपूट हालवे कुभं हेस लेका तू! यू ऽ यू ऽ मनून कोण कुटका टाकला की बसला लुंघळत." (वारुळ पृ. २३३) प्रभूविषयी असणारी मनातील भावना राग, द्वेष, या मित्रांना गणाच्या रागवण्यातून कळतो. शिदनाक प्रभू यांच्या संवादातून आंबेडकरांनी बौध्द मुलांच्या शिक्षणासाठी केलेल्या सोयी दिसतात.

उदा.:— "हो माहया नाताले रहिवाशाचा दाखला पायजे व्हत्ता. तं तू म्हनतं त्याहयचा संप चालू हाये. कव्हा मिटंला ते बी सांगता येत नाही.'

'काय करते तुमचा नातू?'

'औरंगाबादले कॉलेजात शिकायला'

'अस्सं'

'हं, डॉ. बाबासायबानं तिथं आमच्या पोरांसाठी कॉलेज उघडलं. आमच्या जातीच्या पोरायसाठी तिथं सोईसवलती असतात. हे समदे त्या बाबासायबाचे उपकार हायेत" (वारुळ पृ. २४३) आंबेडकरांचे उपकार बौध्द मानतात शिक्षण समता या महत्वाच्या गोष्टी त्यांना दिल्या सालईच्या ओढयावर सिंधीचे बन तोडून

जे धरण बांधले जाणार असते. त्यांचे मातंग स्त्रियांमधील संवाद हे तर काळजीच्या सुरात असलेले दिसतात.

'बाप्पा, मग तं आमच्या पोटावर पाया देयाले तुम्ही?

'आम्ही नाही घायलो आमचं थोडच धरण आहे? धरण आहे सरकारचं. आम्ही सरकारचे नोकर ... आमचं काम कसं? सांगा पाटीलबुवा काय लिहू? उपट पऱ्हाट पेर गहू ... सरकार जसं म्हणंल तसं आम्ही करतो.'

'तुमच्या सरकारला सांगा ना मंग हे धरण करु नका मनून?' (वारुळ पृ. २७०) धरण होणार म्हणजे मातंगाचे सिंधीचे बन तोडले जाणार याची काळजी या संवादातून दिसते.

आपल्याच जातीचे लोक आपल्यालाच त्रांस देतात यंकाला न्याय मिळत नाही. गणा लिंबाचीच बाजू घेतो हा दलितांवर होणारा अन्याय प्रभू—लिंबा यांच्या बोलण्यातून स्पष्ट होतो. बौध्दासारखे मातंगही संघटनेच्या माध्यमातून सुधारले तरी विकासच्या लग्नात वाजंत्र्यांना गणाला सवर्णांकडून योग्य वागणूक मिळत नाही. शामराव थोरात व जळीत प्रकरणातील लोकांना न्याय मिळवायला वेळ जातो. ना. लहाने यांनी संघटनेचे केलेले विश्लेषण हे अत्यंत उत्तम असे उतरले आहे. विकासचे लोक गणाला मारतात गणा प्रभूवर संशय होतो. त्यावेळचे संवादही मनवेधून घेतात ज्योती प्रभूचे मौन सांडविते त्यावेळचे संवादही मनवेधून घेतात. ज्योती प्रभूचे मौन सोडविते त्यावेळचे संवाद दोघांमध्ये असणारे नाते स्पष्ट करतात यंकाच्या आईच्या मातीवेळचे संवाद भाऊबंदकी समाजातले हेवेदावे स्पष्ट करतात. पारु—संतोष यांच्यातल्या संवादातून तिसरी पिढी समाज विकास करण्यास तयार होत असलेली दिसते तर ग्रामपंचायत निवडणूकीत सदस्याची किंमत वसूल करता प्रभू विनायकशी संवाद साधतो. त्यातून हक्कांची, अधिकाराची मातंगांना झालेली जाणिव दिसते. अशाप्रकारे कथानकाच्या गतिमानतेसाठी छोटे—छोटे प्रसंग व त्यातून मुख्य बरोबर गौण व्यक्तिरेखेच्या तोंडी घातलेले संवाद 'वारुळ'चे सौंदर्य वाढवितात.

## ५) 'वारुळ'ची भाषाशैली :—

कादंबरीत भाषाशैलीला महत्वपूर्ण स्थान आहे. लेखनाच्या शैलीतून लेखक ओळखला जातो भाषाशैलीद्वारे पात्रचित्रण, प्रसंगचित्रण यांना आकर्षकता येत

असते. कथानक पात्रचित्रण यांच्याप्रमाणेच हाही कांदबरीचा महत्वाचा घटक आहे. भाषा आणि शैली यावर कांदबरीची परिणाम कारकता असलंबून असते जशी संवादाची भाषा कादंबरीत वेगळी असते तशी निवेदनाची भाषा वेगळी असते. 'भावना व विचार व्यक्त करण्याचे साधन म्हणजे भाषा हाये' लेखकानुसार भाषा बदलते त्याचप्रमाणे कादंबरीतील पात्रे निवेदन व संवाद यानुसार भाषा ही बदलावी अशी अपेक्षा असते. पात्रानुसार भाषा ही गोष्ट आज कादंबरीत महत्त्वाची मामली जाते. कादंबरीची भाषा आशयानुसार बदलते असते. पात्रांच्या स्वभाव वैशिष्टयानुसार शैली बदलताना दिसते. आपण पुढील मुद्यात 'वारुळ' ची भाषाशैली पाहणार आहोत.

### ५.१) वास्तव असलेल्या प्रदेशाची बोलीभाषा :—

'वारुळ' मधील लेखकाचा जीवनानुभव हा विदर्भातील आहे. या कादंबरीमधून लेखकाचा प्रादेशिक जिव्हाळा दिसून येतो. तशा त्यांच्या सर्वच साहित्यातून विदर्भातील वासिम—अनसिंग—अकोला हा भाग येतो. त्यांच्या साहित्यात आजूबातूच्या ग्रामीण—दलित जीवनाचे गावगाडयाचे चित्रण येते. त्या भागातील वऱ्हाडी बोलीभाषा लेखकाने साहित्यात आणली त्यांनी हया परिसरातील भाषेची गोडी आहे. ती अत्यंत ताकदीने, सगळया बलस्थानासह आपल्यासमोर मांडली आहे. मुसळे हे कादंबरी ग्रामीण—दलित साहित्याच्या सीमारेषेवर लिहित असल्यामुळे कादंबरीत दलित जीवन चित्रण येते. बौध्द होण्यापूर्वी बौध्दांकडे गावकीची कामे होती. त्यावर येसाजी मातंग लोकांविषयी भाष्य करतो. "तुले माहित नाही; हे महार जव्हा मेलेले ढोरं फाडत अन् त्याचे हिस्से घालत; तव्हा आपल्या मांगवाडयातले मांग त्या महारायन आपल्यालेबी त्यातलं थोडंफार मास देवावं मनून एकसारखे टुकणी लावून बसत" (वारुळ पृ. ९) दलितांना सोसाव्या लागणाऱ्या हाल अपेष्टा इ. चित्रण या भाषेतून लेखक घडवितात. त्यासाठी विदर्भातील वऱ्हाडी बोलीभाषेचा वापर करतात. हे एक कादंबरीचे बलस्थान आहे. बोलीतले अनेक शब्द आढळतात. उदा: साल—गिल, माहा, महयनाचं, त्यामुळे वऱ्ही, नवकर्की, तुले, मले, आपल्यालेबी, टुकणी, बलावून आणायले कहाले, तुपलं, माहयाकडे याहयच्या, ठैसनात, त्याहयचं रडायलेलं, काजून, बोडखा, एष्टी, कायी, नायी, संघामती, खुरमान, लोकाहयचे, मव्हरं सुतांन, बाहीर, जराक्सं

वऱ्हीवऱ्ही, सेल्यावर, पचरुट, आंजोळी, अंतर्ग्यानी, आमाक्स, मासुळी पव्हणं, हरकेजून, लग्गीले, गथुडे, उपण, मळण, भष्टाकार यंधवा, थाटरली, बिगिनं, बाश्शा, आगेमव्हळ, हाबेतोबे, उंडारायले, तव्हारक इस्तारी, आवतन, इहिरीव, सदी, बाटली झणायले, संरका, येसालासा, वाट्टे लल्डा, पल्डा बाभण, शेर—आस्तेर, डरेस, औदांबी, खेदाडून आग्रेव सामाईन, बॉ, धेवपाट, असे खास बोलीभाषेतील शब्द 'वारुळ' मध्ये पानी विखुरलेले आहेत.

**५.२) मातंगांची भाषा :—**

'वारुळ' मातंग समाज जीवनावर आधारल्याने मातंग समाजातल्या बोलीचा वऱ्हाडीचा; तिच्यासोबत त्यांच्या व्यवसायातील सांकेतिक भाषा येते, प्रभू सनई वाजवायला नाथा सोबत जातो. त्यावेळी नाथा प्रभूला सांगतो.

'त्या पहाय, त्या डांडारनी तुहयाकडं पाहायल्या' यामध्ये 'डांडारनी' हा शब्द बायकांसाठी येतो. 'वयल्या' म्हणजे मटन 'दुतवण' म्हणजे खाणें 'वरवणं' म्हणजे खाणे 'करपटी' भाकरी, 'सातलं' म्हणजे इनाम, 'वरवा' या शब्दाचे अनेक अर्थ निघतात त्यांच्या भाषेतील कांही वाक्ये अशी

'वयल्या दुतवण का?' म्हणजे मटन खाल्लं का?

'करपटी वरवली का?' म्हणजे भाकर खाल्ली का?

'सातलं वरवा? म्हणजे बक्षिस घ्या

'डांडारीन वरवली' म्हणजे बाई पाहिली' (वारुळ पृ. ७४)

दुष्काळात मेलेलं ढोर सोलायची हत्यारे आणण्यासाठी दुसऱ्या जातीच्या म्हणजे जोशी मास्तरांच्याकडे देताना याच भाषेत निरोप दिला जातो.

'यंकादा हयो दांडाळा ठिकल रे' (म्हणजे दुसऱ्या समानाचा माणूस) त्याबरोबर 'ठिकू दे' हे ही शब्द त्याच भाषेत येतात. जोशी मास्तरांना ही भाषा कळत नाही ही त्यांच्या धंदयातली गुपीत सांगण्यासाठी वापरली जाणारी भाषा आहे. जोशी मास्तरांजवळ "ठाकण—ठोकण गंगा, जिथं दिसंल भिंगा, तिथं उत्तर रंगा" (वारुळ पृ. १५२) हा निरोप दिला जातो. यामुळे मराठीत असणाऱ्या जातीनुसार बोलीभाषेची ओळख होते.

५.३) बौध्द समाजाची भाषा :—

बौध्दांची भाषा ही वऱ्हाडीच भाषा कादंबरीत आहे. बौध्द होण्यापूर्वी त्यांची भाषा मातंगांसारखीच होती. दीक्षा घेतल्यानंतर त्यांच्या भाषेत बोलण्या, चालण्यात फरक पडलेला दिसून येतो. यातच येसाजीशी सिदाजी संवाद साधतो. परिवर्तनाच्या चळवळीने त्यांच्या भाषेत फरक पडतो तो वारुळमधून दिसतो. पंडनाक—पाटील यांमधला संवाद बौध्दांचा विकास दाखविते. बोध्दांचे जीवनचित्रण कादंबरीत अल्पसे येते त्यामुळे त्यांच्या भाषेविषयी 'वारुळ' मधून जास्त संदर्भ मिळत नाहीत.

५.४) कुणबी समाजाची भाषा :—

कांदबरीत गावगाडा येत असल्यामुळे ग्रामीण समाजदर्शन त्यांच्या भाषेतून कळते. पाटील वडगावात तालेवर आहेत. कोणतीही गोष्ट त्यांच्या सल्ल्याशिवाय होत नाही. त्यांच्याभाषेतून सर्व गावाला सहानुभूतीने सांभाळून घेण्याचे नेतृत्व गुण दिसतात.

उदा.: "पखवाद वाजविणारा माणूस देतो मी तुम्हाले; पण त्यो तुम्हाले चालंल का पाहा"? (वारुळ पृ. ८९) तर आनंदा बेल्या म्हणतो. "तुमच्या आमच्या रानात बंडिगं नाल्या तयार केल्या ... ? नाही तं आपलं शेतकऱ्यांचचं कसं वळण तयार करायचे ... (वारुळ पृ. १०२) आंबेडकर पुतळा उभारयचा तं तिकडं तुमच्या हद्दीत उभारा ना; आमच्या पोळयाच्या जागेवर काऊन अतिक्रमन करता?" (वारुळ पृ. १८२) तर लिंबा पुतळा उभारायला मदत करुन भांडणे लावून देतो. "पुतळा त्याच जागी उभारा; तुम्ही भिऊ नका कांही कमी जास्त झालं तं मी हाओ तुमच्या पाठीमागं." (वारुळ पृ. १८३) गवना—साधना भांडणात साधना — "तू माह्या नवऱ्याचे पैसे दे नाही तं तुही वागर नेतो माह्या घरी" (वारुळ पृ. १९९) अशी म्हणते किंवा "ए शोभे तू काय मतून नाक खुपसायली आमच्या मंधात?" (वारुळ पृ. १९९) अशाप्रकारे कुणब्यातील पुरुष—स्त्रियांची भाषा स्पष्ट रसरशित जिवंत वाटते. पण त्या भाषेत मग्रुरी असलेली दिसते एकूणच वऱ्हाडी भाषेतून त्या प्रदेशातील व्यक्तिवैशिष्टये कळतात. कादंबरीच्या भाषेतून वऱ्हाडीची गुणवैशिष्टये समजतात. भाषेमुळे मातंग, बौध्द, कुणबी समाजजीवन व प्रसंग चित्रणाला

जिंवतपणा वाटतो. उदा. अण्णाभाऊ साठे जयंतीला गणाने घातलेली हुज्जत तायडे गुरुजींना राठोड गुरुजींनी दिलेला सल्ला, शामराव थोरात जळीत प्रकरण, इ. प्रसंग.

अशा प्रकारे वयानुरुप व्यवसायानुसार, जातीनुसार लिंगानुसार 'वारुळ' मधील भाषेत भिन्नता दिसून येते. हिन्दी शब्दांचाही वापर वऱ्हाडी भाषेत झालेला दिसून येतो. उदा: मुस्किल, मुलाहिजा, नियत, अंदर, आस्मान, जमाना, आदत, बिमार, हमेशा, आबादी, दुस्मन, हरामी, मौत, अनाज, वापस, हरहमेशा बेशरम, जी हुजूर जबान रोटी, तकलिफ याद, इज्जत अशा शब्दांचा वापर केलेला दिसतो. त्याला कारण उत्तर महाराष्ट्रावर झालेले इस्लामी आक्रमण होय. फार्शी, अरबीची छाप तेथील भाषेवर आहे.

६) म्हणी व वाक्यप्रचार :—

निर्मळ चांगुणा अन कुत्रं हुगेना'
खानी तशी बानी व्हशिल कोणावाणी?'
ताकाला जायचं भोडं लपवायचं.
हिडग्याले दिली गाय अन् हिडगं धावूं धावूं गोठणावर जाय.
देव आला देयाले पदर नाही घेयाले.
कराय गेलो काय अन वरती झाले पाय.
गाव करी ते राव नकरी! आधी पोटोबा मग विठोबा,
परंबी तुटो वा शेंडी तुटो.
माय पत करी अन् लेकरु बाळातणीच्या घरी
बिमाराला खावं वाटलं; अन् वैदान खायाले सांगतलं.
नवरदेवाचं लगन अन् मांगाले हारीक.
भोईले भार आणि खायाल काळ
पाटलाचं घोडं येसकराले भूषाण.
मणा वरतीच बघा; नाहीतर चुलीपाशी हागा.
राना बोले दल हाले./ चोराच्या मनात चांदणं.
आपलेच दात आणि आपलेच व्हट.
सर सलामत तो पगडी पचास.
बाप दाखव नाहीतर श्राध्द कर,

नुसतं मले पहा अन् फुलं वाहा.

आली सुगी फुगले गाल; निदाणीचे तेच हाल.'

दोघांचे भाडण तिसऱ्याचा लाभ.

जनते ती कन्हते अन् शेजारीन मनते दे कळा.

येळ पडली बाका तो गध्याला मनायचा काका

खळ्यातील रास वाया जाऊ द्यायची अन मात्र्यासाठी जीव तोडायचा. /

भेटलं मांग फिटल पांग.

याबरोबर हिंन्दी म्हणींचा वापर केलेला दिसतो.

उदा. कुणबी जैसा दाता नही मारे बिगर देता नही.

दुनिया झुकता है। झुकानेवाला चाहिएँ!

तसेच 'हमसे जो टकरायेंगा मिठठीं मे मिल जायेगा' या घोषणेच्या वापराबरोबर. पुढील वाक्यप्रचारांचा वापर केलेला आहे.

पारणं फिटणे,

वडयाचं तेल वांग्यावर काढणे.

आवळा देऊन कोहळा काढणे.

हेवा वाटणे.

घरावर तुळशीराम ठेवणे.

केसाने गळा कापणे.

लाटी न तोडता साप मारणे.

"अं अशी कशी शाळा व्हती? आमच्या शाळंत तं मांगाचे, महाराचे पोऱ्हंबी शिकतात."

"अरे बाबा, भांडणावर काम आलं व्हतं, तव्हा हयो येश्या माह्याकडं पळत आला .... म्या अन् हयानं हिस्से—वाटे ठरवले .... तव्हा कुठं. जमलं ते"

"माहा बापच मने असे लेकरं ठेवलेल्या बाईची असतात मनूनं."

"माणूस कर्माने मोठा होतो जन्माने नव्हे."

"तूं माहा लेकरु धरुन नेयाला. तुवा कितीबी धंदे केलेतरी तुव्हं कवा बरं व्हणार नाही."

"कोणतंही वर्गात आलेलं आंदोलन शेवटी राजकीय स्वरुप घेतल्याशिवाय राहात नाही."

"काळ मोठा खेळया आहे."

"अन् मी घरी राहू? हे पाहाय, माहे डोळे त्यो सोहळा पाहयल्या शिवाय मिटणार नाहीत. घरी राहिलो तर मी झुरुझुरुच मरीन."

अशी समर्पक वाक्ये बोलीभाषेत केलेले निवेदन, पात्रसंवादासाठी वापरलेली बोलीभाषा इ. बोलीभाषा ही 'वारुळ' कादंबरीला सघनता व आशयला समृध्दी देणारी वाटते.

## ७) 'वारुळ' शीर्षकाची प्रतिकात्मकता:—

'वारुळ' हे शीर्षक प्रतिकात्मक आहे. ते परिवर्तनवादी चळवळीच्या सहाय्याने मातंग तरुणांनी केलेल्या समाज संघटनेला उददेशून आहे. 'वारुळ' म्हणजे मुंग्याचे घरटे म्हणजे मातंगांचे घरटे म्हणून संघटनेला संबोधले आहे. घरटयात संरक्षण मिळावे यासाठी मुंग्याची धडपड चालू असते. सापापासून बचाव व्हावा यासाठी त्या जशा एकजूट करतात त्या प्रकारे संघटनेतील प्रत्येक व्यक्ती समाजाला जपायचा प्रयत्न करते पण गणा सारखाच एखादा नागासारखा वागायला लागतो सवर्ण तर संघटना तोडायला टपलेले असतात त्यापासून संरक्षण हे तरुण करतात म्हणून कादंबरीचे 'वारुळ' शीर्षक समर्पक वाटते.

## ८) 'वारुळ' मधील व्यक्तिरेखा :—

नाटकात किंवा कादंबरी या कथनात्मक वाड्.मय प्रकारात व्यक्तिरेखेला महत्त्व असते. एखादया व्यक्तिचे स्वभाव विशेष। त्याची वृत्ती प्रवृत्ती कथन करण्याचा लेखक प्रयत्न करतो म्हणून यामध्ये 'व्यक्ती' ला महत्व येते. त्यामुळे कादंबरीतील घटना घडतात. कथानकाला पूर्णत्व येते व्यक्तिरेखे बद्दल जान्हवी संत लिहितात. "मानवी स्वभावाचे विविध नमुने कादंबरीत चितारले जातात हयासच व्यक्तिचित्रण किंवा चरित्र—चित्रण असे म्हणतात. हे व्यक्तिचित्रण जितके स्वाभाविक असेल, तितकी ती कादंबरी वाचकाला आवडेल."[३] 'वारुळ' या सामाजिक कादंबरीत वासिम—अनसिंग शहरातील व आजूबाजूच्या परिसरातील अस्पृश्य समाजाचे चित्रण येते कादंबरीत तीन पिढयांचे चित्रण येते. यातील पहिली पिढी येसाजीची आहे, दुसरी प्रभूची, तिसरी संतोषची आहे. या मातंगांच्या तिन्ही पिढयातील व्यक्ती व त्याच्यांशी संबंधित अशा बौध्द, कुणबी समाजातील व्यक्तिरेखा येतात 'वारुळ' मध्ये मुख्य पात्रांसोबत इतर म्हणजे गौण पात्रेही येतात.

८.१) मुख्य व्यक्तिरेखा :—

'वारुळ' कादंबरी मुख्यत्वे या मुख्य व्यक्तिरेखांभोवतीच फिरते. या व्यक्तिरेखांबरोबरच त्यांच्याशी गौण व्यक्तिरेखांचा संबंधही येतो. यामध्ये 'प्रभू' ची व्यक्तिरेखा मुख्य आहे. कादंबरीचा तो नायक आहे. कादंबरीत त्याच्या बालपणापासून परिवर्तनवादी चळवळीचा एक सच्चा कार्यकर्ता म्हणून येतो. नम्र संयमशील शांत, योग्याप्रमाणे एकूणच त्याचे वागणे असलेले दिसते त्याबरोबर गणा हा तर कादंबरीचा प्रतिनायक आहे. प्रभूचाच वर्गमित्र त्याच्याच समाजातला आहे. परंतु त्याचे व प्रभूचे कधी पटलेच नाही. एक विध्वंसक व्यक्तिरेखा म्हणून कादंबरीत शेवटपर्यंत येते.

येसाजी ही एक मुख्य व्यक्तिरेखा असून दुसऱ्या पिढीतील आहे. वडगावचा तो गावकामदार येसकर आहे. हाप्त्याचा रिपोर्ट तालुक्याला पोलीस स्टेशनला देतो. पाटलांच्या सल्ल्याने तो हे काम करतो इतर मातंग लोक मात्र गावकीच्या कामात असतात भगवान पाटील गावचे पाटील आहेत. सगळयांशी ते सामोपचाराने वागतात येसाजीवर त्यांची मर्जी असते. गावातल्या शाळेतले कुलकर्णी मास्तर ही एक आदर्श व्यक्तिरेखा आहे. प्रभूसारख्यांना मानवतावादी विचार देऊन परिवर्तनात सहभागी व्हायला लावणारी व्यक्तिरेखा आहे. भिका हा येसाजीच्याच पिढीतला गणाचा वडिल आहे. सनईच्या जोडातून काढले म्हणून येसाजीवर तो राग धरुन असतो दारुचा धंदा करतो त्याचे घराणेच एकूणच आडमुठे आहे. गावाला व मातंगांना तो आव्हान करतो. त्याचाच गुण गणात उतरलेले असतात. यादव येसाजीला प्रत्येक कामात मदत करतो. गावकीची कामे करतो. सनई चौघडयाच्या जोडात वाजवायला जातो. तायडे मास्तर एक शिक्षक परंतु मातंग समाजातल्या मुलांनी शिकावे अन्यायाविरुध्द आवाज उठवावा, समाजोन्नती व्हावी यासाठी परिवर्तनाच्या माध्यमातून प्रबोधन करतात त्यांच्याजवळ सामाजिक बांधिलकी आहे. डॉ. भोपळे साहेबांची चळवळ ते खेडापाडयात पोचवून समाजजागृती करतात सूर्यकांत साठे वासिमच्या संघटनेचे अध्यक्ष असतात संघटनेच्या कार्यात सक्रिय असणारी प्रभूच्या कामावर खुश असणारी व्यक्तिरेखा आहे. तसेच डॉ. भोपळे यांचे व्यक्तिमत्व फारच थोडे आलेले आहे.

अशाप्रकारे कादंबरीत वरील व्यक्तिरेखा बरोबर गौण व्यक्तिरेखाही घटना, प्रसंगानुसार येतात.

## ८.२) गौण व्यक्तिरेखा :—

या व्यक्तिरेखा 'वारुळ' मध्ये भरपूर प्रमाणात आलेल्या दिसतात व्यक्तिरेखेंचा रेलचेल झालेली यामध्ये स्त्री व्यक्तिरेखेंत पारु ही प्रभूची बायको आहे. प्रभूच्या सामाजिक कार्यात तिचा अप्रत्यक्ष वाटा असतो. संतोषला ती घडवते. संतोष हे तिला आंबेडकरांचा आवतार वाटतो. बायना ही दुसरी गौण पण कादंबरीत महत्त्वाची व्यक्तिरेखा आहे. येसाजीला गावकीच्या कामात मदत करते प्रभूला शिकवते. त्यांच्यावर संस्कार करते. गवना यंकाची बायको साधना गवनाला मारते. धमकी देते यादवला आजारी असताना कवठयांला मर्तिकाचा निरोप दयायला जावे लागते. गणाची भावजयी राधा प्रभूचा मुलगा संतोष, राजू खंदारे ज्योति ही प्रभू बरोबर संतोषला शुध्द बोलण्याचे धडे देते शिकविते. शिदनाक, विनायक, पंडनाक चिनकुनाक अशा प्रसंग परत्वे कादंबरी भर येणाऱ्या गौण व्यक्तिरेखा आहेत. त्या वेधक जिवंत वाटाण्यात अशा स्वभाव वैशिष्टयानुसार लेखक उभारतो.

## ९) 'वारुळ' मधील वातावरण :—

कादंबरीचा इतर घटकांप्रमाणेच वातावरण हाही महत्त्वाचा घटक आहे. लेखक वातावरण निर्मिती करुन प्रसंग पात्र आपल्या समोर उभे करतो. वातावरणासाठी विशिष्ठ स्थळ, काळाची गरज असते. कोणताही प्रसंग कोणत्यातरी ठिकाणी घडतो, कोणतीतरी एक वेळ त्यासाठी ठरविलेली असते. व्यक्तिंची तसेच कथानकाच्या वाढीसाठी वातावरणाची आवश्यकता असते. कादंबरीत सामाजिक वातावरणं आलेले असते. या वातावरणातून स्थळ आणि काळ व्यक्त होत असतो. त्यातूनच प्रादेशिक व ऐतिहासिक कादंबऱ्या तयार होतात म्हणून प्र. वा. बापट यांच्या मते "स्थळ, काल वैशिष्टयांचे कादंबरीत पडलेले प्रतिबिंब म्हणजेच वातवरण होय."[४] वातावरणाची निर्मिती करीत असताना स्थळ, काल यांच्या परिणामातून वातावरणाची निर्मिती होत असते 'वारुळ' मध्येही लेखकाने वातावरण निर्मिती परिणाम कारकपणे साधली आहे. पडीचा हिस्सा आणायला गेलेला येसाजी

त्यावेळचे वर्णन "हिस्सा बांधून आणण्यासाठी घरुन मळका—चळका धोतराचा पालव घेऊन येसाजी सगळा गाव तुडवत उंबरवाटेवरच्या चिंचेकडे निघाला गावात कोणाचंही ढोर मेलं, तर ते या चिंचेखाली आणून सोललं जायचं मेलेल्या ढोराचं कातडं चिंचेवरचं वाळू घातलं जायचं. हे काम महाराकडे होतं तेंव्हाही इथंच केलं जायचं" (वारुळ पृ. १२) अशा लहान लहान प्रसंग निवेदनातून वातावरण निर्मिती साधली. बौध्द मातंग यांच्यामध्ये पूर्वीपासून वैर आहे. त्यांच्यात कायम वितुष्ठ निर्माण होते. त्याची ही वातावरण निर्मिती सत्यता पटवून देते.

पौराणिक वातावरणाची निर्मिती पौराणिक संदर्भ देऊन मुसळे उभे करतात. उदा. शंकर पार्वती कपिला गाई मातंग ऋषी इ. चे संदर्भ वातावरण व मातंगांचे समाजातील स्थान स्पष्ट करणारे आहेत. शाळा मारुतीच्या मंदिरात भरवावी असे कुलकर्णी मास्तर पाटीलांनी सांगतात. पण गाववाले त्याला विरोध करतात. कारण महारा—मांगांच्या मुलांमुळे देव बाटेल असे त्यांना वाटते या प्रसंगाची वातावरण निर्मिती लेखक रामा बेल्याच्या उद्‌गारातून स्पष्ट करतात. "मास्तर मारोतीच्या पारावर शाळा भरवून आमचा देव बाटवायचा इचार हाये' का ' (वारुळ पृ. २०)

कुलकर्णी मास्तरांच्या घरी प्रभूला मिळालेली मानवतावादी वागणूकीचे वातावरण तर एक आदर्श नमुनाच आहे. ते अस्पृश्यता पाळीत नाहीत. एक आदर्श व्यक्ती म्हणून ती कादंबरीत वावरते. सिदाजी पाटीलांचा कुस्तीचा शौक त्याने त्यांच्या गावाला पडलेलं नाव तो प्रसंग वाचकांच्या मनात राहातो दीर्घकाळ राहातो. वातावरण निर्मितीमुळेच पाटील मातंगांच्या घराविषयी विचार करतात स्त्रियांना आंघोळीसाठी न्हान्या करायला सांगतात. याही प्रसंगाची वातावरण निर्मिती योग्य अशी केलेली दिसते. पाटील, पंडनाक यामधील संवादाने बौध्दाचे सुधारणेचे विचार भाषा वाचकांच्या लक्षात येते. पेरणीच्या वेळी, पोळयाच्या जागी, खळयावर भांडोळा गीत म्हणताना मातंगांना मान भेटतो. भाडोळाचे गीत गाताना त्यांना म्हणावी लागणारी आरतीही त्या वातावरणात भर घालते. भिका सनईच्या जोडातून बाहेर पडतो. त्याला सुपारी घेण्यावरुन राग येतो. त्यावेळी नाथा भिका यांमधल्या संवादातून त्यावेळचे वातावरण समजते.

भिका बायकोच्या आठवणीने खळयावरुन रात्रीच घरी येतो त्यावेळी खळयातील रास, मजूर बैल यांच्या वर्णनातून इथे रात्रीच्यावेळचे वातावरण लेखक समर्पक उभे करतात. त्यावेळी घरी आल्यानंतर त्याची सासू घरात आलेली असते.

विश्वासची मेलेली गाय आणि मातंगांना झालेला आनंद या दोन्ही गोष्टींही संवादातून वातावरण निर्मिती महत्त्वाची वाटते.

'कोण हाये बापू?

'मी हाओ. इश्वास बेल्या?

'काय मनतो बापू?'

'अरे, आपली गाय मेली गडया'

ही बातमी ऐकून तिथं बसलेल्या संगळयांचे चेहरे उजळले त्यांनी एकमेकांकडे पाहिले." (वारुळ पृ. ५४) मातंग स्त्रियांची परिस्थिती सांगतांना योग्य वातावरण तयार केलेले दिसते.

वऱ्हाड नेतानाचे वातावरण, दुष्काळाची स्थिती सांगताना केलेली वातावरण निर्मिती आपल्याला वास्तववादी वाटते. बँडचा उगम व त्यावेळी येसाजीच्या मनात येणारे विचार वेगळया वातावरणाची निर्मिती करते. बौध्दांचा पुतळा उभारणी — व त्यातून निर्माण झालेला संघर्ष हे वर्णन करुन संघर्षमय वातावरणाची निर्मिती लेखकाने केलेली आहे. वाशिमच्या संघटनेच्या कार्यक्रमाची तयारी कार्यक्रम याविषयी तर अनेक संदर्भ एकत्र घेऊन वातावरणाची निर्मिती केलेली दिसते. तायडे मास्तरांची बदली, ग्रामपंचायत निवडणुका या तणावग्रस्त वातावरण मुसळे समर्पक शब्दात वाचकांसमोर उभे करतात. "२मेला प्रत्यक्ष मतदान ... म्हणजे २१ एप्रिल ते २ मे — मोजून पंधरा दिवस बाकी .... मग धामधूम सुरु झाली मतदार वळविण्यासाठी भेटणं, बोलणं, विनवणं, पाया पडणं, दबाव आणणं, रुसवे फुगवे काढणं सुरु झालं". (वारुळ पृ.४६३) सरपंच निवडणूकीच्या वेळचा प्रसंग लेखक सांगतात मातंगांचा सदस्य गजू याला गणा मोटार सायकलवरुन कुठेतरी नेतो त्यांची प्रभूच्या मनात दाटलेली शंका ही वातावरणातून समजते. "आज २५ तारीख आज दुपारी २ वाजता सरपंच उपसरपंच पदाच्या निवडणुकीला ग्रामपंचायत ऑफिसात सुरुवात होणार जसजसे घडळयाचे काटे पुढे पुढे सरकू लागले तसतसा प्रभूचा जीव झुरणी .... गजूला घेऊन गणा येईल ... किती वाजता येईल"? (वारुळ पृ. ४८५) सरपंचपदासाठी गजू लिंबाला मत देत नाही विकासला देतो. विकास सरपंच होतो. लिंबाच्या पार्टीचा नामदेव उपसरपंच होतो. हा सर्व खेळ गजूंच्या मताने होतो. त्यामुळे राणाने लिंबा, राजाराम हे गणा गजूला शाळेच्या पाठीमागे नेऊन मारतो. हा सर्व तपशिल लेखकाच्या निवेदनातून वातवरण निर्मितीतून वाचकांना कळतो.

## ९.१) शैली :—

शैलीला ढोबळ मानाने ढब, लकब, धाटणी, पध्दत असे म्हटले जाते. साहित्य कृतीची शैली असते. प्रत्येक लेखकानुसार, कलाकृतीनुसार, वाङ्मय प्रकारानुसार शैली बदलत असते 'व्यक्ती तितक्या प्रवृत्ती त्याप्रमाणे व्यक्ती तितक्या शैली' असेही म्हटले जाते. प्रत्येकाची जगण्याची रित वेगवेगळी असते. त्यालाच 'जीवनशैली' म्हणतो प्रत्येक साहित्यिकाची जगण्याची पध्दती वेगळी असते. साहित्यकृतीही तशी आपल्या समोर अवतरत असते. शैली विषयी प्रा. रा. ग. जाधव म्हणतात. "एखादी साहित्यकृती ज्या रुपात आपणासमोर येते त्या संमग्र रुपाला 'अभिव्यक्ती' म्हटले तर या अभिव्यक्तीच्या काही विशेषांना शैली म्हणता येईल".[७] एखादी कलाकृती वाचतो त्यावेळी त्यातील घटकांची अभिव्यक्ती होते ते घटक आपल्याला समजतात या व्यक्त होणाऱ्या साहित्यिकाच्या विशेषांना शैली म्हटले जाते.

बाबाराव मुसळे यांचाही एक लिहिण्याची पध्दत आहे. त्यांचे विचार आशय, विषय आपल्यापर्यत त्यांची साहित्यकृती पोचविते. त्यावरुन त्यांच्या लिहिण्याच्या पध्दतीची खास ओळख होते. साधी सरळ, ओघवती निवेदन शैली. लेखनात पाल्हाळीकता असलेली दिसते. काही ठिकाणी आत्मनिवदेन स्वत: करताना त्यांचे व्यक्तिमत्त्व त्यात डोकावते पाल्हाळीकतेमुळे बारीक सारीक सर्व तपशिल मुसळे खास देतात त्याने वास्तव जीवंत चित्र वाचकांच्या समोर उभे राहाते. कथानक गतिमान होते.

पात्रे प्रसंग चित्रणाला खास ते उठावदारणा देतात. ग्रामीण बोलीने व त्यामधील नवीन शब्दानिर्मित्तीने त्यांच्या लेखनात वऱ्हाडीचा बाज येतो सर्व रुढी परंपरासह ती साहित्यात अवतरते हिंन्दी भाषेचा शब्दांचा लेखनात वापर हेही त्यांचे खास वैशिष्टये म्हणता येईल.

## १०) 'वारुळ' मधील लेखकाची तटस्थवृत्ती :—

मुसळेंच्या लेखनात कुठेही उत्तादीकरण दिसत नाही. जे काय पहायलंय अनुभवलंय त्याची ते तटस्थपणे चिकित्सा करतात व त्या जाणिवेची बीजे कादंबरीभर दिसतात. इथे ज्या प्रकारची, स्वरुपाची संवेदनशीलता आहे.

भावनात्मकता आहे ती इहिहासक्रमाच्या आकलनातून सिध्द झालेली आहे. एकूण जी काही आर्थिक सामाजिक, सांस्कृतिक स्थित्यंतरे आजूबाजूला घडतात त्यांची स्फंदने नेमकेपणाने येतात. आधुनिक काळातील स्थित्यंतरे त्यांचे भावनात्मक परिणाम संवेदनात्मक परिणाम काय होतात हे ही कादंबरीत नोंदवत आहे. कादंबरीत अनेक छोटे छोटे संवाद येतात. ती संवादात्मकता आहे संवाच्या रुपाची अंगाची निवड आहे. ती अर्थपूर्णता आणणारी आहे मोठी आहे.

- **समारोप :—**

अशाप्रकारे 'वारुळ' ची निवेदन पध्दती ओघवती आहे. निवेदन चित्ताकर्षक बनले आहे. एक सामाजिक कादंबरी असल्यामुळे मातंग—बौध्द कुणबी समाजदर्शन महत्त्वपूर्ण घडते. बाबाराव मुसळेंच्या भाषेत प्रवाहीपणा थेटपण, तटस्थता आहे. अलंकारीक भाषेचा सोस या भाषेला नाही. कादंबरीतील कांही वाक्ये स्थल, कालाचे भान देतात. 'तटस्थता' हे या कादंबरीचे वैशिष्टये आहे. अस्पृश्यतेवरील भाष्ये मात्र एवढी प्रभावी वाटत नाहीत संवादाचा वापर करुन संवादात्मकतेतून कादंबरीत सौंदर्य आपले संयमी, सहनशील नायक 'प्रभू' कादंबरीत पहायला मिळतो.

- **निष्कर्ष :—**

१) 'वारुळ' कांदबरीतील निवेदनासाठी तृतीयपुरुषी निवेदन पध्दतीचा वापर केला आहे.

२) हे निवदेन देशातील सामाजिक, राजकीय, ऐतिहासिक संदर्भांना टिपत जाते.

३) समाज वास्तवाबरोबर परिवर्तनवादी चळवळीचा आलेख लेखक मांडतात.

४) मांतंग समाजाच्या तीन पिढयांचा इतिहास व सामाजिक संघर्ष गावपातळींवरच्या राजकारणातून उध्द्भवलेला आहे. त्याचे दर्शन घडते.

५) कादंबरीत संवादात्मकता साधलेली आहे. संवाद हे कादंबरीच्या गतिमानतेसाठी येतात.

६) संवादासाठी वापरलेली भाषा ही प्रसंगपरत्वे, पात्रपरत्वे बदलत जाते.

७) 'वारुळ' कादंबरीची भाषा जीवंत, प्रभावी व परिणामकारक आहे.

८) छोटया—मोठया वाक्यांनी ती सिध्द झाली आहे.

९) वयपरत्वे, व्यवसायानुसार, लिंगानुसार वारुळच्या भाषेत फरक पडलेलां दिसतो.

१०) 'वारुळ' कांदबरीची भाषाशैली तिला साजेशी व परिणमकारक आहे.

११) कादंबरीतील पात्रे, निवेदन व संवाद यानुसार 'वारुळ' मधील भाषा बदलते.

१२) 'वारुळ' या सामाजिक कादंबरीने दलित कादंबरी प्रवाहाला हातभार लावला आहे.

## • संदर्भसूची :—


| | | |
|---|---|---|
| १) | वणकुद्रे वसंत | उगवाई अंक ८ वर्ष पहिले (ऑगस्ट) १९८९. |
| २) | डहाके वसंत आबाजी | संज्ञा संकल्पना कोश<br>ग. रा. भटखळ प्रकाशन मुंबई. |
| ३) | संत जान्हवी | कादंबरी एक वाङ्.मयप्रकार<br>मोघे प्रकाशन, कोल्हापूर प्रथमावृत्ती<br>नोव्हें १९७१ पृ. ६१. |
| ४) | बापट प्र. वा.<br>गोडबोले ना. वा. | मराठी कादंबरी तंत्र आणि विकास<br>तिसरी आवृत्ती १९७३<br>व्हिनस प्रकाशन, पुणे. |
| ५) | जाधव रा. ग. | वाङ्.मयीन निबंधलेखन स्वरुप आणि<br>सौंधणे सप्टेंबर १९६० पृ. ९१. |
| ६) | मुसळे बाबाराव | 'वारुळ' (२००४) साकेत प्रकाशन, औरंगाबाद<br>प्रथमावृत्ती. |